cmyk

## संपादकीय

### तर भारतीय शेती संकटात...

अमेरिका-इस्त्रायल आणि इराण युद्धाचे चटके आता पश्चिम आशियाबरोबरच जगाला बसताना दिसून येत आहेत. मध्यपूर्वेतील या विनाशकारी तणावाचे भारतासारख्या कृषिप्रधान देशाच्या बांधापर्यंत परिणाम जाणवू लागले आहेत. हे युद्ध ट्रम्प यांच्या म्हणण्यानुसार दीर्घकाळ चालले तर या संघर्षाशी संबंध नसणारे देश या युद्धात आपोआप ओढले जाऊ शकतात. तिसऱ्या महायुद्धासारखी परस्थिति निर्माण होऊ शकते. या युद्धाला तोंड फुटून पाचच दिवस झाले असताना त्याची झळ आता शेतमाल पर्यायाने शेतकरी व व्यापाऱ्यांना बसताना दिसत आहे.


दैनिक www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड - महाराष्ट्र | वर्ष-५ | अंक-३०८ | शुक्रवार दि.०६ मार्च २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये


## थोडक्यात...

### मुंबईत वायू प्रदूषण नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई

मुंबईः तील वाढत्या वायू प्रदूषणाच्या समस्येवर नियंत्रण मिण्यासाठी राज्य शासन गंभीर असून, बांधकाम प्रकल्पांसाठी निश्चित केलेल्या नियमावलीची काटेकोर अंमलबजावणी केली जात आहे. मुंबईतील बांधकाम प्रकल्पांवर वायू प्रदूषण मापन यंत्रे बसवणे, धूळ नियंत्रणाचे उपाय करणे आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येत असल्याची माहिती राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी विधानसभेत तारांकित प्रश्नात दिली. मुंबईतील वायू प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी बांधकाम प्रकल्पांवर कोणती कार्यवाही करणार असा प्रश्न विधानसभा सदस्य मनीषा चौधरी यांनी विधानसभेत तारांकित प्रश्नोत्तरांच्या तासात उपस्थित केला होता.

### अमेरिकेचे तेल टँकर उडविले

तेहरानः बुधवारी अमेरिकेच्या पाणबुडीने इराणच्या युद्धनौकेवर भीषण हल्ला केला होता. ही युद्धनौका भारतामधून पुन्हा इराणकडे परतत होती. या युद्धनौकेतील ८७ जणांचा मृत्यू झाल्याची बातमी समोर आली. मात्र या घटनेला २४ तास उलटत नाहीत तोच इराणने या हल्ल्याचा बदला घेतला आहे. इराणच्या नौदलाने उत्तर फारसच्या खाडीमध्ये अमेरिकन तेल टँकर मिसाईलने उडवून दिले आहे. याबाबत इराणच्या रेव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्सकडून माहिती देण्यात आली आहे. आम्ही अमेरिकेच्या ज्या जहाजावर हल्ला केला, ते जहाज अजूनही खाडीमध्ये जळत असल्याचे इराणने म्हटले आहे.

### खामेनी यांच्या निधनावर भारताकडून शोक व्यक्त

नवी दिल्लीः इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या निधनानंतर भारत सरकारने अधिकृतपणे शोक व्यक्त केला आहे. परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी नवी दिल्लीतील इराणच्या दूतावासाला भेट देऊन खामेनी यांना श्रद्धांजली वाहिली. यावेळी त्यांनी दूतावासात ठेवलेल्या शोकपुस्तकावर स्वाक्षरी केली आणि शोक व्यक्त केला. विक्रम मिस्री यांनी इराणच्या राजनैतिक प्रतिनिधींशी चर्चा करून भारताचा शोकसंदेश त्यांच्याकडे सुपूर्द केला..भारताने इराणशी दीर्घकाळ राजनैतिक आणि आर्थिक संबंध राखले आहेत. म्हणूनच, या घटनेला भारताने दिलेला प्रतिसाद प्रादेशिक राजनैतिकतेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

### व्हॉट्सअॅप आधारे घटस्फोटाचा देता येत नाही

मुंबई : ''केवळ व्हॉट्सअॅप चॅट किंवा मेसेजच्या पुराव्यावर अवलंबून घटस्फोटाचा आदेश दिला जाऊ शकत नाही. हिंदू विवाह कायद्यानुसार, जर एखादी व्यक्ती जोडीदारावर क्रूरतेचे आरोप करत असेल, तर ते आरोप कोर्टात कायदेशीररित्या सिद्ध होणे आवश्यक आहे; तसेच विरोधी पक्षाला सादर केलेल्या पुराव्यांविरुद्ध युक्तिवाद करण्याची आणि स्वतःचे निर्दोषत्व सिद्ध करण्याची पूर्ण संधी मिळणे आवश्यक आहे,'' असे मुंबई उच्च न्यायालयाने एका घटस्फोट प्रकरणाच्या सुनावणीवेळी स्पष्ट केले. कुटुंब न्यायालयाने मे २०२५ मध्ये केवळ व्हॉट्सअॅप चॅट्स आणि एसएमएसच्या आधारे पतीला एकतर्फी घटस्फोट मंजूर केला होता. व्हॉट्सअॅप चॅट्समध्ये पत्नीने पतीला घर सोडण्यासाठी तगादा लावल्याचे आणि सासरच्यांबद्दल अपमानास्पद भाषा वापरल्याचे निरीक्षण नोंदवत क्रूरतेच्या आधारावर कौटुंबिक न्यायालयाने घटस्फोटाला मंजुरी दिली होती.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.०४ मार्च २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| गहू: १०८.०० क्विंटल | | |
| १,८०० | २,६१५ | २,२०९ |
| ज्वारी/हायब्रिड:१८१.०० क्विंटल | | |
| २,२०० | ४,२०० | ३,३१२ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | | |
| १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : ४२.०० क्विंटल | | |
| ६,२०० | ७,५०० | ७,०९३ |
| उडीद : ५.५० क्विंटल | | |
| ५,२०० | ५,२०० | ५,२०० |
| बाजरी: १३.०० क्विंटल | | |
| २,४१० | ३,००० | २,६३७ |
| मुग: २.०० क्विंटल | | |
| ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: २९.५० क्विंटल | | |
| ४,८०० | ५,२६१ | ५,०६५ |
| हरभरा: ६३.५० क्विंटल | | |
| ४,९०० | ५,१०० | ५,०१७ |

# राज्यात अतिवृष्टी-पूरामुळे शेतीचा वेग मंदावला!

## विकास दर ९.१ वरून ३.४ टक्क्यांवर; आर्थिक पाहणी अहवालात वास्तव स्पष्ट; ९४.८२ लाख हेक्टर पिकांचे नुकसान, १.१६ कोटी शेतकरी प्रभावित

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील अर्थव्यवस्था वेगाने वाढत असताना शेती क्षेत्राची घसरलेली कामगिरी चिंताजनक असल्याचे चित्र राज्याच्या आर्थिक पाहणी अहवालातून समोर आले आहे. गेल्या वर्षी सेवा आणि उद्योग क्षेत्रालाही मागे टाकत सर्वाधिक वाढ नोंदविणाऱ्या शेती क्षेत्राचा विकास दर यंदा मोठ्या प्रमाणात घटला आहे. शेती आणि संलग्न क्षेत्राचा विकास दर तब्बल ५.७ टक्क्यांनी घसरून ३.४ टक्क्यांवर येण्याची शक्यता वर्तविण्यात आली असून अतिवृष्टी, पूर आणि हवामानातील बदल यामुळे शेतीची मोठी वाताहत झाल्याचे या अहवालातून स्पष्ट झाले आहे.**



राज्याचे अर्थ राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी गुरुवारी (दि.५) राज्याचा 'आर्थिक पाहणी अहवाल २०२५-२६' विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात सादर केला. या अहवालातून राज्याच्या अर्थव्यवस्थेची एकूण वाढ यंदा ७.९ टक्के राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. मागील वर्षाच्या तुलनेत ही वाढ अधिक असल्याचेही अहवालात नमूद करण्यात आले आहे. अर्थव्यवस्थेच्या वाढीत सेवा आणि उद्योग क्षेत्राचा मोठा वाटा असल्याचे दिसून आले आहे. सेवा क्षेत्राची वाढ गेल्या वर्षीच्या ८.३ टक्क्यांवरून ९ टक्क्यांपर्यंत पोहोचली असून उद्योग क्षेत्रातही सुधारणा झाली आहे. उद्योग क्षेत्राची वाढ ४.३ टक्क्यांवरून ५.७ टक्क्यांपर्यंत वाढल्याचे अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे. मात्र, शेती क्षेत्राची कामगिरी यंदा निराशाजनक ठरल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. मागील वर्षी शेती आणि संलग्न क्षेत्राने ९.१ टक्क्यांची विक्रमी वाढ नोंदवली होती. परंतु चालू आर्थिक वर्षात हा विकास दर मोठ्या प्रमाणात घसरून ३.४ टक्क्यांवर येण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. आर्थिक पाहणी अहवालानुसार हवामानातील अनिश्चितता, पाण्याची टंचाई, शेतीसाठी लागणाऱ्या निविष्ठांच्या वाढत्या किमती आणि बाजारपेठेतील चढउतार ▶▶ पान २ वर

### तब्बल ९४ लाख ८२ हजार हेक्टरवर नुकसान

राज्यात जून ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत झालेल्या मुसळधार पावसामुळे आणि पूरस्थितीमुळे खरिपाच्या तब्बल ९४ लाख ८२ हजार हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले. या नैसर्गिक आपत्तीचा फटका राज्यातील सुमारे १ कोटी १६ लाख शेतकऱ्यांना बसल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

# राज्यसभेची निवडणूक बिनविरोध होणार

## पवारांच्या घरातून आजोबा आणि नातू सोबतच जाणार राज्यसभेवर

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यसभेच्या निवडणुकीत अखेरच्या क्षणी ट्विस्ट आला आहे. दोन उमेदवार देण्याची चर्चा असलेल्या शिंदेंच्या शिवसेनेने अखेर एकच उमेदवार दिला आहे. ज्योती वाघमारे यांनी अर्ज सादर केला असून, रोहित टिळकांचा उमेदवारी अर्ज भरण्यात आला नाही. त्यामुळे राज्यातील सात जागांसाठी अखेर सात अर्ज दाखल झाल्याने ही निवडणूक बिनविरोध होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे शरद पवार आणि नातू पार्थ पवार हे एकाच वेळी राज्यसभेवर जाणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.**



राज्यसभेच्या निवडणुकीसाठी भाजपकडून चार, राष्ट्रवादीकडून एक आणि शिवसेनेकडून एक असे सहा अर्ज दाखल झाले. तर दुसऱ्या बाजूला महाविकास आघाडीकडून शरद पवारांचा अर्ज दाखल झाला आहे. ▶▶ पान २ वर

### शरद पवारांचा अर्ज अधिकाऱ्यांनी घरी जावून भरला

राज्यसभेच्या निवडणुकीचा अर्ज भरण्यासाठी शरद पवार उपस्थित राहू शकले नाहीत. तब्येतीच्या कारणामुळे त्यांना हजर राहता आले नाही. त्यामुळे निवडणूक अधिकाऱ्यांनी शरद पवारांच्या घरी जाऊन सगळी प्रक्रिया पूर्ण केली. आजारी व्यक्ती राज्यसभेचा अर्ज दाखल करण्यासाठी येऊ शकला नाही अशी पहिलीच घटना घडली.

### असे आहेत उमेदवार

भाजप - रामदास आठवले, विनोद तावडे, माया चिंतामण ईवनाते आणि रामराव वडकुते. शिवसेना शिंदे गट - ज्योती वाघमारे. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट - पार्थ पवार. महाविकास आघाडी - शरद पवार.

## ट्रक-एसटीचा भीषण अपघात; १३ जण गंभीर

बीड । प्रतिनिधी

केज-कळंब रस्त्यावर उभ्या असलेल्या ट्रकला प्रवाशांनी भरलेल्या एसटी बसची जोरदार धडक लागून भीषण अपघात घडला. या अपघातात १३ जण जखमी झाले आहेत. जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर पुढील उपचार सुरू आहेत. घडलेल्या घटनेनंतर परिसरात आणि प्रवाशांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

मिळालेल्या माहितीनुसार, केज-कळंब रस्त्यावर साळेगावपासून जवळ असलेल्या चिंचोली पाटी जवळ



सकाळी ६:०० वाजता हा अपघात झाला. रस्त्यावर उभ्या असलेल्या ट्रकला प्रवाशांनी भरलेल्या कोल्हापूर-माजलगाव गाडीची धडक लागली. या धडकेत ▶▶ पान २ वर

# कोणत्याही समस्येवर लष्करी संघर्ष तोडगा नाही-पंतप्रधान मोदी



नवी दिल्ली । वृत्तसंस्था

पश्चिम आशियात अमेरिका-इस्रायल विरुद्ध इराण यांच्यात युद्धाचा भडका उडाला असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या युद्धावर महत्त्वाचे भाष्य केले आहे. पंतप्रधान मोदी म्हणाले कायद्याचे राज्य, संवाद आणि राजनैतिक मुत्सद्देगिरीवर भारत विश्वास ठेवतो. लष्करी संघर्ष हा कोणत्याही समस्येवरचा तोडगा नाही. भारत आणि फिनलंड हे कायद्याचे राज्य, संवाद आणि राजनैतिक मुत्सद्देगिरीवर विश्वास ठेवतात.

केवळ लष्करी संघर्ष कोणताही प्रश्न सोडवू शकत नाही. यावर फिनलंड आणि भारताचे एकमत आहे. मग तो युक्रेनमधील संघर्ष असो किंवा पश्चिम आशियातील संघर्ष असो. हा संघर्ष लवकरात लवकर संपून शांतता प्रस्थापित व्हावी, अशी कामना आम्ही करतो, असेही पंतप्रधान मोदी म्हणाले. फिनलंडचे राष्ट्राध्यक्ष अलेक्झांडर स्टब यांच्याशी झालेल्या ▶▶ पान २ वर

### खामेनीच्या मृत्यूने मोदींना दुःख

३ मार्च रोजी इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांचा इस्रायल आणि अमेरिकेच्या हल्ल्यात मृत्यू झाला होता. यानंतर भारताने पश्चिम आशियातील परिस्थितीचा उल्लेख करत इराण आणि आखाती प्रदेशातील संघर्ष असा केला होता. या संघर्षात अनेक लोकांचे जीव गेले आहेत आणि आम्ही त्याबद्दल दुःख व्यक्त करतो असे भारताने म्हटले होते. पंतप्रधान मोदी यांनी याबाबत दुःख व्यक्त केले आहे.

# राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत धर्मांतर विरोधी कायदा मंजूर

मुंबई । प्रतिनिधी

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत धर्मांतर विरोधी कायदा मंजूर करण्यात आला आहे. मंत्री नितेश राणे यांनी गुरूवारी विधान भवनाच्या आवारात माध्यमांना प्रतिक्रिया देताना याबाबत माहिती दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत धर्मांतर विरोधी कायदा मंजूर करण्यात आला.



गेल्या अनेक महिन्यांपासून राज्यात धर्मांतर विरोधी कायदा लागू होणार असल्याची चर्चा होती. मंत्री नितेश राणे यांच्याकडून वारंवार याबाबत भाष्य केले जात होते. अखेर राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. अधिवेशनात याबाबतचा कायदा आगामी काळात पारित केला ▶▶ पान २ वर

# मक्याला एक हजार हमीभाव फरक द्या

## मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी अब्दुल सत्तार यांची विधानसभेत मागणी

मुंबई । प्रतिनिधी

**शेतमालास भाव नाही. मराठवाड्यात मका उत्पादक शेतकऱ्यांची भयानक अवस्था आहे. शेतकरी आत्महत्या करत आहेत. तो हवालदिल झाला आहे. सुरुवातीला मक्याचा भाव ८०० रुपये होता. आता १,४०० रुपये झाला. शासनाचा हमीभाव प्रतिक्विंटल २,४०० रुपये आहे. बाजारातील विक्री आणि हमीभाव यात प्रतिक्विंटल एक हजार रुपयांचा फरक आहे. त्यासाठी मध्य प्रदेश सरकार राबवत असलेल्या योजनेच्या**



**धर्तीवर एक हजार हमीभाव फरक सरकारने द्यावा, अशी मागणी सिल्लोडचे आमदार अब्दुल सत्तार यांनी गुरुवारी (दि. ५ मार्च) विधानसभेत केली.**

**महाराष्ट्र विधानसभा नियम २९३ अन्वये प्रस्तावावर चर्चा करताना त्यांनी शेतकऱ्यांच्या व्यथा मांडल्या.**

आ.सत्तार यांनी याबाबत सविस्तर बोलताना म्हटले की, कापूस १ हजार रुपये कमी भावाने खासगी जिनिंगवाले करत आहेत. सीसीआयची खरेदी बंद झालेली आहे. अशा परिस्थितीत ज्या शेतकऱ्याकडे कापूस आहे, तो शेतकरी हवालदिल आहे. त्याच्यापुढे आत्महत्येची परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्यासाठी सरकारने शेतकऱ्यांकडे लक्ष द्यावे, अशी विनंती सत्तार यांनी केली. सरकारने शेतकऱ्यांना गोठा दिला, विहीर दिली. पण ४ वर्षांपासून त्याचा पैसा मिळालेला नाही. विहीर खोदेण्यासाठी खासगी सावकाराकडून पैसे घेतल्याने ते अडचणीत आले आहेत. त्यांना कधी पैसे देणार?, रोजगार हमीचे काम कधी चालू होणार? असे प्रश्न त्यांनी उपस्थित केले. शेतमालाची खरेदी करताना आधारभूत किमतीत व्हावी. काही ठिकाणी गोदामे, बारदान नाही, असे सांगितले जात असल्याचे त्यांनी नमूद केले. वन्यप्राणी दहा ते पंधरा एकरचे क्षेत्र एका रात्रीत, एका दिवसात उद्ध्वस्त ▶▶ पान २ वर

### कर्जमाफी करताना जाचक अटी नकोत

शेतकरी कर्जमाफीबाबतही त्यांनी भाष्य केले. कर्जमाफी करताना जाचक अटी लादू नयेत. यावर अधिवेशनात अंतिम निर्णय घ्यावा. कर्जमाफी झाल्याशिवाय शेतकरी सक्षम होणार नाही. शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबणार नाहीत, असे त्यांनी म्हटले.

## राज्यसभेवरुन शिंदेसेनेत नाराजीनाट्य

मुंबई । प्रतिनिधी

राज्यसभा निवडणुकीसाठी अर्ज भरायला अवघे काही तास राहिलेले असताना शिंदेसेनेने ज्योती वाघमारे यांना उमेदवारी जाहीर केली. पक्षातील वरिष्ठांना, दिग्गजांना मागे टाकून वाघमारेंनी राज्यसभेचे तिकीट मिळवले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. यानंतर शिंदेसेनेत नाराजीनाट्य पाहायला मिळत आहे. माजी खासदाराने याबद्दल मनातील खदखद बोलून दाखवली आहे.

राज्यातील राज्यसभेच्या ७ जागा रिक्त होत आहेत. यासाठी ४ पक्षांकडून ७ नावे जाहीर करण्यात आली आहेत. ७ जागांसाठी ७ उमेदवार रिंगणात असल्याने निवडणूक बिनविरोध होईल. शिंदेसेनेकडून माजी खासदार आनंदराव अडसूळ, राहुल शेवाळे, संजय निरुपम, प्रवक्त्या शायना एनसी यांची नावे चर्चेत होती. मात्र या दिग्गजांना मागे टाकून ज्योती वाघमारे यांनी बाजी मारली. यानंतर अडसूळ यांनी त्यांची नाराजी जाहीरपणे ▶▶ पान २ वर

cmyk

अग्रलेख

# तर भारतीय शेती संकटात...

अमेरिका-इस्त्रायल आणि इराण युद्धाचे चटके आता पश्चिम आशियाबरोबरच जगाला बसताना दिसून येत आहेत. मध्यपूर्वेतील या विनाशकारी तणावाचे भारतासारख्या कृषिप्रधान देशाच्या बांधापर्यंत परिणाम जाणवू लागले आहेत. हे युद्ध ट्रम्प यांच्या म्हणण्यानुसार दीर्घकाळ चालले तर या संघर्षाशी संबंध नसणारे देश या युद्धात आपोआप ओढले जाऊ शकतात. तिसऱ्या महायुद्धासारखी परस्थिती निर्माण होऊ शकते. या युद्धाला तोंड फुटून पाचच दिवस झाले असताना त्याची झळ आता शेतमाल पर्यायाने शेतकरी व व्यापाऱ्यांना बसताना दिसत आहे. दुबईमार्गे आखाती देशांमध्ये शेत माल कांदा निर्यात होतो. परंतु युद्धजन्य परिस्थितीमुळे दुबई येथील मार्केट पूर्णपणे बंद झाले आहे. त्यामुळे निर्यात थांबली आहे.

मुंबईतील जवाहरलाल नेहरू पोर्ट (जेएनपीटी) बंदरावर नाशिक आणि महाराष्ट्रातील दीडशेहून अधिक कांद्याने भरलेले कंटेनर्स निर्यातीच्या प्रतीक्षेत आहेत. दुबई येथे माल स्वीकारला जात नसल्याने हजारो टन कांदा कंटेनरमध्ये अडकून पडण्याची शक्यता आहे. कांदा निर्यात थांबल्याने देशांतर्गत कांद्याचे भाव पुन्हा कोसळण्याची शक्यता आहे. हा कांदा कंटेनरमध्ये दीर्घकाळ पडून राहिल्यास शेतकऱ्यांवर पुन्हा शिमगा करण्याची वेळ येऊ शकते. एकट्या नाशिकचा ५४०० टन कांदा निर्यातीच्या प्रतीक्षेत आहे. सरकारने यावर तत्काळ उपाययोजना न केल्यास शेतकरी संघटनेने राज्यव्यापी चक्का जामचा इशारा दिला आहे. रमजानच्या महिन्यात भारतातील द्राक्षांना पश्चिम आशियातून मोठी मागणी असते. त्यामुळे द्राक्ष निर्यातीवरदेखील परिणाम होणार आहे. यावर्षी द्राक्षाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात झाल्याने शेतकऱ्यांना आपली आर्थिक विवंचनेतून सुटका होईल असे वाटत असताना त्यांचा हिरमोड होताना दिसत आहे. निर्यातदेखील आता थांबली आहे. युद्धापूर्वी केळीला २५०० रुपये प्रतिक्विंटल भाव होता, आता तो १५०० रुपयांवर आला आहे. इराणमध्ये भारतातील बासमती तांदळाला मोठी मागणी आहे. युद्धामुळे पंजाब आणि हरयाणातील बासमती उत्पादक शेतकऱ्यांना याचा मोठा फटका बसला आहे. बासमती तांदळाचा ७,१०० रुपये प्रतिक्विंटलचा दर ५,९०० प्रतिक्विंटलपर्यंत घसरला आहे. शेतमाल घेऊन गेलेले महाराष्ट्रातील कंटेनर्स सध्या दुबईमध्ये अडकले आहेत. यात कांदा, मका, मिरची, टोमॅटो या नाशवंत मालांचा समावेश आहे. दुसरीकडे इराणमधून भारतात सुकामेवा, खजूर, काजू, बदाम, पिस्ता आयात केला जातो. युद्धामुळे आयात होणाऱ्या सुकामेव्याच्या किमतीत मुंबईतील क्रॉफर्ड आणि वाशी मार्केटमध्ये मोठी वाढ होताना दिसत आहे. युद्धापूर्वी इराणी पिस्ता १६५० रुपये प्रतिकिलो होता तो २४०० रुपयांवर पोहोचला आहे. मामरा बदाम १८०० रुपयांवरून २८०० रुपये प्रतिकिलो झाला आहे. इराण हा रासायनिक खतांचा मोठा उत्पादक देश असल्याने खतांच्या किमतीतदेखील ३० ते ४० टक्के वाढ होण्याची शयता आहे. भारताचा पश्चिम आशियाशी होणारा मोठा व्यापार हा हॉर्मुजच्या सामुद्रधुनीमार्गे होतो. इराणने ही सामुद्रधुनी बंद केली आहे. परिणामी भारताचा जवळपास ५० टक्के व्यापार प्रभावित होण्याची शयता आहे. तसेच गॅस व पेट्रोलियम पदार्थांचा आयातीवर परिणाम होऊ शकतो. युद्ध लांबल्यास पेट्रोल आणि डिझेलची गरज भागवण्यासाठी भारताला रशियासारखे नवे पर्याय शोधावे लागतील. भारताला प्रतिबॅलर ८० रुपये डॉलरनी मिळणाऱ्या कच्च्या तेलाचे भाव शंभर रुपये प्रतिडॉलरपर्यंत गेले आहेत. इराणच्या हल्ल्यानंतर कतार एनर्जी कंपनीने एलएनजीचे उत्पादन थांबवले आहे. कतार जगातील एलएनजी उत्पादन करणारा पाचवा देश आहे. त्यांनीच उत्पादन थांबवल्याने गॅसच्या दरात वाढ झाली आहे.

भारत आखाती देशातून ८० ते ८५ टक्के एलपीजीची आयात करतो. भारताकडे कच्च्या तेलाप्रमाणे गॅसचा राखीव साठा नाही. सध्या भारत ६० टक्के एलएनजी होर्मुझच्या सामुद्रधुनीमार्गे मागवतो. यामुळे एलपीजी आणि एलएनजीसाठी भारताला नवे पर्याय शोधावे लागतील. भारताकडे सध्या तीन महिने पुरेल एवढा तेलाचा साठा आहे. या युद्धामुळे सोने-चांदीचे दरदेखील वाढले आहेत. शेअर बाजारामध्ये रोज पडझड सुरू आहे. युद्ध संपेपर्यंत आणि त्यानंतर काही महिने ही स्थिती पूर्वपदावर येण्यास वेळ लागणार आहे. परदेशात अडकलेल्या नागरिकांबरोबरच आखाती देशात अडकलेल्या शेतमालाबाबत तसेच गॅस, तेल आयातीबाबत भारताला प्रभावी उपाय योजावे लागणार आहेत.

## उद्योगविश्वात आदित्य पॉलिटेक्निकची दमदार झेप; विद्यार्थ्यांची अभ्यासपूर्ण औद्योगिक मोहीम



### वीज निर्मितीची प्रक्रिया, कच्च्या मालापासून अंतिम उत्पादनासह विद्यार्थ्यांनी औद्योगिक सुरक्षिततेचे नियम घेतले जाणून

बीड । प्रतिनिधी

**विद्यार्थ्यांची अभ्यासपूर्ण औद्योगिक मोहीम तांत्रिक शिक्षणाला उद्योग क्षेत्राची प्रत्यक्ष जोड देण्याच्या उद्देशाने बीड येथील आदित्य पॉलिटेक्निकच्या विद्युत अभियांत्रिकी विभागामार्फत जयसिंगपूर व शिरोळ (जि. कोल्हापूर) येथे औद्योगिक भेटीचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व उद्योगातील आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख व्हावी, या हेतूने हा उपक्रम राबविण्यात आला. या भेटीत विद्यार्थ्यांनी वीज निर्मितीची प्रक्रिया, कच्च्या मालापासून अंतिम उत्पादनासह औद्योगिक सुरक्षिततेचे नियम जाणून घेतले.**

औद्योगिक भेटीची संकल्पना संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात आली. विद्यार्थ्यांनी श्रीराम इलेक्ट्रिकल लिमिटेड, जयसिंगपूर येथे कॅपॅसिटर निर्मिती प्रक्रियेचे सखोल निरीक्षण केले. कच्च्या मालापासून अंतिम उत्पादनापर्यंतची संपूर्ण प्रक्रिया, गुणवत्ता तपासणी पद्धती, विविध तांत्रिक चाचण्या, औद्योगिक सुरक्षिततेचे नियम यांची माहिती तज्ज्ञांकडून देण्यात आली. विद्यार्थ्यांना पॉवर फॅक्टर सुधारणा, रिऍक्टिव्ह पॉवर व्यवस्थापनाचे महत्त्व प्रत्यक्ष उदाहरणांसह समजावून सांगण्यात आले. यानंतर विद्यार्थ्यांनी वसंत इलेक्ट्रिकल ट्रान्सफॉर्मर मॅन्युफॅक्चरिंग लिमिटेड येथे ट्रान्सफॉर्मर कोअर असेंब्ली, एलव्ही व एचव्ही वाइंडिंग, व्हॅक्युम ऑईल फिलिंग प्रक्रिया, इन्सुलेशन तंत्रज्ञानाचा अभ्यास केला. टेस्टिंग लॅबमध्ये शॉर्ट सर्किट टेस्ट, रेशो टेस्ट, इन्सुलेशन रेसिस्टन्स टेस्ट यांचे प्रात्यक्षिक पाहिले. विद्यार्थ्यांचा तांत्रिक आत्मविश्वास वाढला. तिसऱ्या टप्प्यात विद्यार्थ्यांनी श्रीदत्त पावर प्लांट, शिरोळ येथे को-जनरेशन पद्धतीद्वारे वीज निर्मितीची संपूर्ण साखळी समजून घेतली. बॉयलरमधील वाफ निर्मिती, टर्बाईनची कार्यप्रणाली, जनरेटर समक्रमण, कंट्रोल रूममधील डिजिटल मॉनिटरिंग प्रणालीचे प्रत्यक्ष निरीक्षण करण्यात आले. उद्योगातील तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. करिअर संधी, शिस्त, वेळेचे व्यवस्थापन, सुरक्षिततेचे महत्त्व अधोरेखित केले. या औद्योगिक भेटीस संस्थेचे संचालक डॉ. आदित्य सारडा, प्राचार्य डॉ. राहुल खडके, विभागप्रमुख प्रा. जाधव डी.एम. तसेच प्रा. शहाणे एस.बी., प्रा. कांबळे पी.व्ही. व प्रा. वीर ए.एम. यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांनी उद्योगातील प्रत्यक्ष अनुभव घेतल्यास त्यांची संकल्पना अधिक स्पष्ट होते. त्यांचा आत्मविश्वास वाढतो. त्यामुळे अशा प्रकारचे उद्योगाभिमुख उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहेत.

## भक्तीच्या महाकुंभात पात्रुडनगरी न्हाली

### ह.भ.प.भगवान बाबा महाराज पात्रुडकर यांची नर्मदा परिक्रमा पूर्ण

माजलगाव । प्रतिनिधी

**'नर्मदे हर'च्या जयघोषात, टाळ-मृदंगाच्या गजरात आणि अबालवृद्धांच्या उपस्थितीत पात्रुड गावचे सुपुत्र श्री ह.भ.प. भगवान बाबा महाराज पात्रुडकर यांचे नर्मदा परिक्रमा पूर्ण करून स्वगावी जंगी आगमन झाले. अत्यंत कठीण मानली जाणारी सुमारे साडेतीन हजार किलोमीटरची पायी परिक्रमा यशस्वीरीत्या पूर्ण करून परतलेल्या महाराजांच्या स्वागतासाठी संपूर्ण पात्रुड परिसरात भक्तीचा पूर लोटला होता.तपस्येची सांगता आणि ग्रामस्थांचा उत्साह**

नर्मदा परिक्रमा ही आध्यात्मिक क्षेत्रातील एक मोठी तपस्या मानली जाते. मैयाला उजव्या हाताला ठेवून, अनवाणी पायांनी आणि अत्यंत साध्या राहणीमानाने हा प्रवास करावा लागतो. भगवान बाबा महाराजांनी ही वारी निष्ठेने पूर्ण केली. महाराज गावात येणार ही वार्ता समजताच पात्रुड ग्रामस्थांनी संपूर्ण गावाची स्वच्छता करून रस्ते रांगोळ्यांनी सजवले होते. गावाच्या वेशीवर महाराजांचे आगमन होताच सुवासिनींनी मंगल कलश घेऊन त्यांचे औक्षण केले आणि पुष्पवृष्टी केली.गावातील मुख्य मार्गावरून महाराजांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी वारकरी संप्रदायातील भागवत भुजबळ व भजनी मंडळांनी विठ्ठल नामाचा आणि नर्मदा मैयाचा जयघोष करत वातावरण भक्तिमय करून सोडले. ठिकठिकाणी भाविकांनी महाराजांचे पाय धुवून दर्शन घेतले. आमच्या गावच्या सुपुत्राने एवढे मोठे पुण्यकर्म आणि खडतर प्रवास पूर्ण केला, याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे, अशा भावना ग्रामस्थांनी व्यक्त केल्या. मिरवणुकीनंतर आयोजित सत्संग सोहळ्यात महाराजांनी आपले अनुभव कथन केले. ते भावूक होऊन म्हणाले, बाबा मनोगत नर्मदा परिक्रमा हा केवळ शारीरिक प्रवास नसून तो आत्मिक शुद्धीचा मार्ग आहे. साडेतीन हजार किलोमीटरचा हा प्रवास मैयाची कृपा आणि आपल्या सर्वांच्या आशीर्वादानेच निर्विघ्नपणे पार पडला. निसर्ग आणि मानवी मूल्यांची जपणूक हाच खरा धर्म आहे. याप्रसंगी पात्रुड गावचे सरपंच पती लतीफ मोमीन, उपसरपंच घनश्याम भुतडा, माजी सरपंच एकनाथ मस्के, बाळासाहेब बनकर, शिवाजी गोमचाळे, महारुद्र जंगले, महावितरण कंपनीचे कर्मचारी पांडुरंग जामकर , नामदेव पोपळघट,गावातील सर्व मान्यवर व नागरिक महिलावर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थिती होते आणि या स्वागत सोहळ्याला परिसरातील अनेक नामवंत कीर्तनकार, प्रवचनकार, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर पंचक्रोशीतील बाबाला मानणारा सर्व महिला पुरुषवर्ग मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. महाराजांच्या स्वागतानिमित्त पात्रुडमध्ये महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यामुळे गावात दिवाळीसारखा सण साजरा होत असल्याचे चित्र पाहायला मिळाले.

## जिल्ह्यात महिला दिनापासून एचपीव्ही लसीकरण मोहीम

### पात्र मुलींना मोफत दिली जाणार आरोग्यदायी लस

बीड । प्रतिनिधी

**महिला व मुलींच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या एचपीव्ही एचपीव्ही लसीकरण मोहिमेचा बीड जिल्ह्यात ८ मार्चपासून शुभारंभ होणार आहे. या मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील पात्र मुलींना मोफत लस देण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली.**

या मोहिमेच्या तयारीसाठी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. या बैठकीत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, जिल्हा शल्यचिकित्सक, आरोग्य विभागाचे अधिकारी तसेच विविध विभागांचे प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीत लसीकरण मोहिमेचे नियोजन, मानव संसाधन, कोल्ड चेन व्यवस्था आणि जनजागृती कार्यक्रमांचा आढावा घेण्यात आला. गर्भाशय मुखाच्या कर्करोगापासून संरक्षण देण्यासाठी एचपीव्ही लस अत्यंत प्रभावी मानली जाते. भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेच्या (आयसीएमआर-एनसीआरपी, २०२२) अहवालानुसार भारतात दरवर्षी मोठ्या प्रमाणात महिलांना या कर्करोगाचा सामना करावा लागतो. २०२२ मध्ये भारतात ७९१०३ नवे रुग्ण आढळून आले. ३४८०५ रुग्णांचा मृत्यू गर्भाशयमुख कर्करोगामुळे झाल्याचा अंदाज आहे.त्यामुळे प्रतिबंधात्मक उपाय म्हणून एचपीव्ही लसीकरण महत्त्वाचे ठरते.

या मोहिमेत गार्डासिल-४ (गार्डासिल-४) ही लस देण्यात येणार असून ती



एचपीव्हीचे ६, ११, १६ आणि १८ या प्रकारांपासून संरक्षण देते. ही लस सुरक्षित व प्रभावी असून पात्र मुलींना मोफत देण्यात येणार आहे. जिल्ह्यात १४ वर्षे पूर्ण झालेल्या मुलींना ही लस देण्यात येणार असून जिल्ह्यात सुमारे २२,२५३ मुलींचे लसीकरण करण्याचे उद्दिष्ट आहे. लसीकरणासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये, जिल्हा रुग्णालय तसेच काही शैक्षणिक संस्थांमध्ये व्यवस्था करण्यात येणार आहे. लसीकरण मोहिमेत आरोग्य सेविका, आशा कार्यकर्त्या, अंगणवाडी सेविका तसेच आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांचा सहभाग राहणार आहे. कोल्ड चेन, यू-विन डिजिटल नोंदणी प्रणाली तसेच लॉजिस्टिक व्यवस्था जिल्हा प्रशासनाने पूर्ण केली आहे. जिल्हा प्रशासनाने सर्व पालक व नागरिकांना आवाहन केले आहे की, पात्र मुलींनी एचपीव्ही लस घेऊन गर्भाशय मुखाच्या कर्करोगापासून संरक्षण मिळवावे आणि या महत्त्वाच्या सार्वजनिक आरोग्य मोहिमेत सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे.

## सोनाराला लुटणाऱ्या टोळीस मिनी मकोका-पोलीस अधीक्षक काँवत

बीड । प्रतिनिधी

**माजलगाव तालुक्यातील मंजरथ रोडवर दिवसाढवळ्या एका सोनाराला लुटणाऱ्या टोळीला पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी मकोका हा कायदा लावला आहे. हे धाडसी कारवाई समजली जाते.**

बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी बीड जिल्ह्याचा कार्यभार स्वीकारल्यानंतर बीड जिल्हयात होत असलेल्या चोऱ्या, घरफोड्या, जबरी चोऱ्या, दरोडा टाकणारे गुन्हेगारावर करडी नजर आहे. त्याअंनुषगाने त्यांनी जिल्ह्यात घडणा-या चोरी/दरोड्याच्या गुन्ह्यातील आरोपीस तात्काळ अटक करून त्यांच्याकडुन चोरीस गेलेला मुद्देमाल हस्तगत करून त्यांची गुन्हेगारी पाश्वभुमि पाहुन कारवाई करण्याच्या सुचना बीड जिल्ह्यातील सर्व प्रभारी अधिकारी यांना दिलेल्या आहेत. दि.२५.०१.२०२६ रोजी यातील फिर्यादी नामे अमोल पंढरीनाथ गायके वय ३३ वर्षे व्यवसाय सोनार दुकान रा. मजरंत रोड भाटवडगाव ता. माजलगाव जि. बीड याने फिर्याद दिली की मी व माझा पुतण्या सोन्या चांदीचे दागिने पिशवीमध्ये घेवुन आठवडी बाजाराला जात असतांना गढी रोडवर सकाळी ०९.०० वाचे सुमारास अज्ञात तीन चोरट्याने मोटर सायकलवर माझा पाठलाग करून सत्तुरचा धाक दाखवुन माझ्या ताब्यातील ५९,३३,५८०/-रूपये किमंतीचे सोन्या चांदीचे दागिने जबरदस्तीने चोरून नेले वगैरे मजकुरचे फिर्यादी वरून सदरचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्याचा तपास सपोनि पांडव व पोनि बालक कोळी हे करीत आहेत. यातील आरोपी निष्पन्न करून त्यांना गुन्ह्यात अटक करण्यात आले. एकुन पाच आरोपीतांनी हा गुन्हा केल्याचे तपासामध्ये निष्पन्न झाले आहे. त्यापैकी चार आरोपीना पकडण्यात पोलीसांना यश आलेले आहे. अटक आरोपीतांची नावे १) कृष्णा तुकाराम निरडे वय २२ वर्षे रा. पावरहाऊस रोड माजलगाव जि. बीड (टोळी प्रमुख) २) अभिषेक अशोक शिंदे वय २२ वर्षे रा. सदर ३) एकनाथ अरून कपाले वय ३५ वर्षे रा. कॅनॉल रोड शाहुनगर बीड ४) संजीव उर्फ संजय विष्णुदास कांबळे वय २८ वर्षे रा.उमरगा मन्न ता. उदगीर जि. लातुर अशा चार आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. त्यांची पीसीआर घेवुन तपास करण्यात आला. पीसीआर दरम्यान आरोपीच्या ताब्यातुन २९,२२,६००/-रूपयाचे सोन्या चांदीचे दागिने जप्त करण्यात आले आहेत. पाचवा आरोपी फरार आहे. पोलीस त्याचा शोध घेत आहेत. यातील टोळी प्रमुख याने संघटीत गुन्हेगाराची टोळी तयार करून संघटीतरित्या बीड जिल्हयात ७ गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर गुन्हे हे शस्त्राचा धाक दाखवुन आर्थिक फायद्यासाठी केल्याचे निष्पन्न झाल्याने बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी गुरूवारी पोस्टे माजलगाव ग्रामिण गुरन.३०/२०२६ कलम ३१०(२), ३०९ (४), १२६ (२) भारतीय न्याय संहिता सह कलम ४/२५ भारतीय हत्यार कायदा १४२ मपोका या गुन्ह्यात नवीन भारतीय न्याय संहिता या कायदयाप्रमाणे मिनी लावण्याचे अधिकार पोलीस अधीक्षकांना प्राप्त झाल्याने कलम १११ संघटीक गुन्हेगारी (मिनी मोक्का) लावण्याची परवानगी पोलीस निरीक्षक माजलगाव ग्रामीण यांना दिली आहे. सदरची कामगिरी नवनीत काँवत पोलीस अधीक्षक बीड, अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके, पो.नि. शिवाजी बंटेवाड, स्थागुशा बीड यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि. बालक कोळी, सपोनि पांडव, पोअ/ संजय राठोड, पोस्टे माजलगाव ग्रामिण यांच्यासह स्थागुशाचे सपोउपनि अभिमन्यु औताडे पोह/गोविंद राख पोअ/बिबीशन चव्हाण असेंनी मिळून केली आहे. भविष्यातही अशा प्रकारच्या गुन्हेगाराच्या टोळ्यावर मोक्का लावण्याचे संकेत पोलीस अधीक्षक बीड यांनी दिले आहेत.

## सौ.के.एस.के महाविद्यालयात गझल गायनाचा कार्यक्रम संपन्न

बीड । प्रतिनिधी

दिनांक ४ मार्च २०२६ रोजी सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू, कला, विज्ञान व वाणिज्य् ? महाविद्यालय बीड येथे संगीत विभागाच्या वतीने मराठी हिंदी गझल गायनाचा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमात सर्वप्रथम नवगण शिक्षण संस्थेच्या सहसचिव मा. दीपाताई क्षीरसागर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ.अनिता शिंदे , कमवि उपप्राचार्य डॉ. नारायण काकडे, पदव्युत्तर विभाग प्रमुख डॉ. ए. एस. खान या मान्यवरांच्या हस्ते काकू- नाना यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. मा. दीपाताई क्षीरसागर यांनी दीप प्रज्वलन करून पुढील गझल गायन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

गझल गायन कार्यक्रमाच्या सुरुवातीस संगीत विभाग प्रमुख डॉ.राहुल सोनवणे यांनी ''अंदाज आरशाचा'' ही गजल गाऊन श्रोत्यांचे मने जिंकली. तसेच संगीत विभागाचे प्राध्यापक सुरेश थोरात यांनी ''रणजी से सही'' ही गजल गाऊन श्रोत्यास मंत्रमुग्ध केले. मा. दीपाताई क्षीरसागर यांनी ''तू प्यार करे या ठुकराये'' ही शास्त्रीय गझल अगदी ताकतीने सादर करून श्रोत्यांच्या हृदयापर्यंत पोहोचवली संगीत विभागाचे प्रा. दीपक जमदाडे यांनी ''तेरी यादों के पल ना हो या जुदा ऐसा किया मैने ही'' गझल अगदी श्रोत्यांशी संवाद करत गायली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.दीपक जमदाडे यांनी केले व आभार व्यक्त डॉ. दुष्यंता रामटेके यांनी केले. महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पान १ वरून...

### राज्यात अतिवृष्टी-पूरामुळे

यामुळे शेतीसमोर मोठी आव्हाने निर्माण झाली आहेत. विशेषतः गेल्या पावसाळ्यात झालेल्या अतिवृष्टी आणि पूरस्थितीचा शेतीवर गंभीर परिणाम झाला. दरम्यान, नुकसानीचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्य सरकारने ९ हजार २२ कोटी रुपयांची मदत मंजूर केल्याची माहितीही आर्थिक पाहणी अहवालात देण्यात आली आहे. दरम्यान, शेती क्षेत्रातील घटलेला विकास दर राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी चिंतेचा विषय ठरत आहे. हवामान बदल, उत्पादन खर्चातील वाढ आणि बाजारपेठेतील अनिश्चितता या तिहेरी संकटामुळे शेतीसमोर मोठे आव्हान उभे ठाकले असून पुढील काळात शेतीसाठी दीर्घकालीन धोरणात्मक उपाययोजना करण्याची गरज तज्ज्ञांकडून व्यक्त केली जात आहे.

----------

### ट्रक-एसटीचा भीषण

एसटी चालक आणि कंडक्टरसह इतर १३ प्रवासी जखमी झाले आहेत. जखमींना उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालय केज येथे हलवण्यात आले. घटनेची माहिती मिळताच पोलिस हेडकॉन्स्टेबल राजू वंजारे यांनी अपघातग्रस्तांच्या उपचारासाठी तातडीने मदतीसाठी प्रयत्न केले. तसेच अपघातस्थळी पोलिस उपनिरीक्षक राकेश बनसोडे यांनी भेट दिली. या दुर्घटनेत चालक आनंद गायके, वाहक विष्णू तांबडे आणि प्रवासी संजय खरात, खरात, भास्कर गायकवाड, आशा खरात, सचिन खरात, रोशनी खरात, भाग्यश्री गायकवाड, पायल गायकवाड, सुनीता खरात, सचिन सुरवसे आणि वैशाली राऊत अशी जखमी झालेल्या प्रवाशांची नावे आहेत. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवित हानी झाली नाही.

------------

### राज्यसभेची निवडणूक

त्यामुळे ही निवडणूक आता बिनविरोध झाल्याचे समोर आले आहे. राज्यसभेच्या निवडणुकीसाठी शिंदेंच्या शिवसेनेकडे अतिरिक्त २० मते तर राष्ट्रवादीकडे अतिरिक्त तीन मते आहेत. त्यामुळे एकनाथ शिंदे हे दुसरा उमेदवार देणार आणि शरद पवारांपुढे आव्हान निर्माण करणार असे चित्र होते. त्यासाठी रोहित टिळक यांच्या नावाचीही चर्चा सुरू होती. मात्र अखेरच्या क्षणी शिंदेंच्या शिवसेनेने दुसरा उमेदवार दिला नाही आणि राज्यसभेची निवडणूक बिनविरोध झाली.

-------------

### राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत

जाण्याची शक्यता आहे. विधानसभेच्या निवडणुकीच्या निमित्ताने आम्ही सगळ्यांनी ठणकावून सांगितले होते की, महाराष्ट्रात सक्षम असा धर्मांतर विरोधी कायदा म्हणजे लव्ह जिहाद विरोधी कायदा हा आमचा हिंदुत्ववादी विचाराचे सरकार घेऊन येईल, असा शब्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तेव्हा दिला होता. महाराष्ट्राच्या हिंदू समाजाने विश्वास ठेवून आपल्या हक्काचे हिंदूत्ववादी विचारांचे सरकार महाराष्ट्रामध्ये निवडले. महाराष्ट्रात एक सक्षम धर्मांतर विरोधी कायदा हा कॅबिनेटमध्ये पास झाला आहे, असे मंत्री नितेश राणे म्हणाले. धर्मस्वातंत्र्य अधिनियम २०२६ या अंतर्गत लवकरच जीआर निघेल. यापुढे आमच्या कुठलीही हिंदू बहिणीकडे कुठलाही हिरवा साप, जिहादी वाकड्या नजरेने पाहू शकणार नाही. अशा पद्धतीने त्याने कुठलाही लव्ह जिहाद करण्याचा प्रयत्न केला तर आता महाराष्ट्रामध्ये अतिशय सक्षम धर्म स्वतंत्र अधिनय २०२६ असा कायदा लागू झाला आहे. यासाठी मी आमचे हिंदूत्ववादी विचारसराचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, दोन्ही उपमुख्यमंत्री आणि पूर्ण कॅबिनेटचे मनापासून आभार मानतो, अशी प्रतिक्रिया मंत्री नितेश राणे यांनी दिली.

---------------

### कोणत्याही समस्येवर लष्करी

चर्चेनंतर पंतप्रधान मोदी यांनी संयुक्त पत्रकार परिषदेत बोलत असताना युक्रेन आणि पश्चिम आशियातील सशस्त्र संघर्षावर भाष्य केले. फिनलंडबरोबर यावर्षी आम्ही भारतात वर्ल्ड सर्क्युलर इकॉनॉमी फोरमचे आयोजन करत आहोत. यामुळे आमच्या शाश्वततेच्या प्रयत्नांना नवी गती आणि कल्पना प्राप्त होईल. वाढत्या जागतिक आव्हानांना तोंद देण्यासाठी जागतिक संस्थांमध्ये सुधारण करणे केवळ आवश्यकच नाही तर तातडीने यावर उपाययोजना करणे गरजेचे आहे. सर्व प्रकारच्या दहशतवादाला मुळापासून उखडून फेकण्याबद्दल आमचे एकमत आहे असेही पंतप्रधान मोदी म्हणाले. दरम्यान, फिनलंडचे राष्ट्राध्यक्ष अलेक्झांडर स्टब म्हणाले, आज आम्ही सुरक्षा विषयावर चर्चा केली. सध्या पश्चिम आशिया आणि युक्रेन याठिकाणी संघर्ष पेटला आहे. आमच्याबाबत बोलायचे झाल्यास रशियाची युक्रेनविरोधातील आक्रमकता बराच काळ टिकली आहे. रशिया-युक्रेन युद्धाला चार वर्ष होत आली आहेत. हे युद्ध संपुष्टात येणे हेच सर्वांच्या हिताचे आहे.

----------

### राज्यसभेवरुन शिंदेसेनेत

बोलून दाखवली. वरिष्ठांच्या मनात जे होते, ते झाले. आता त्यावर अधिक बोलणे मला योग्य वाटत नाही, अशा शब्दांत आनंदराव अडसूळ यांनी मनातील खंत बोलून दाखवली. केंद्रीय मंत्री अमित शहांपासून अनेकांनी आश्वासने दिली. राज्यपाल करणार असे सांगितले, त्याला २ वर्षे लोटली. या कालावधीत १० राज्यपाल नियुक्त झाले. पण माझा नंबर लागला नाही, असे अडसूळ म्हणाले. शेवटी मीच ऑफर दिली. राज्यपाल पदाचा विषय सोडा, तुमच्या कोट्यातून राज्यसभा तरी द्या. माझी मागणी काही चुकीची नव्हती. प्रत्येक वेळी हो हो म्हटले जाते. पण होत काहीच नाही. त्यांनी दिलेले नाही आणि भविष्यात देणारही नाहीत. हा माझा अनुभव आहे, अशा शब्दांत अडसूळ यांनी नाराजी व्यक्त केली.

--------

### मक्याला एक हजार हमीभाव

करत आहे. या प्रश्नी वन विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा केली. पण त्याचा फायदा झालेले नाही. जंगलात पाणीसाठे नाहीत. यामुळे जनावरे जंगलातून बाहेर निघत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार दि. ६ मार्च २०२६


## थोडक्यात

### पोलीस पाटील पदभरती –मुलाखती ७ मार्च ऐवजी ११ मार्चला होणार – गौरव इंगोले

माजलगाव । प्रतिनिधी

उपविभागीय अधिकारी कार्यालय माजलगाव अंतर्गत रिक्त असलेल्या पोलीस पाटील पदभरती–२०२६ च्या अनुषंगाने दि. २२/०२/२०२६ रोजी लेखी परीक्षा घेण्यात आलेली होती, सदर परीक्षेत पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखतीचे वेळापत्रक पूर्वी निश्चित करण्यात आलेले होते परंतु काही प्रशासकीय कारणास्तव दि.७मार्च रोजी होणारी मुलाखत दि.११मार्च रोजी होणार आसल्याची माहिती उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

प्रसिद्धी पत्रकात उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले यांनी सांगितले आहे की पोलीस पाटील पद भरती मुलाखत दि.७ मार्च २०२६ ला होणार होती. मात्र प्रशासकीय कारणास्तव सदरील ७ मार्च ची मुलाखत पुढे ढकलण्यात आली असून ,त्या मुलाखती दि.११मार्च सकाळी १०वाजल्या पासुन सायंकाळी ६ वाजेपर्यंत उपविभागीय अधिकारी यांच्या दालणात घेण्यात येणार आहे

तरी संबंधीत सर्व उमेदवार यांना सूचित करण्यात येते कि, मुलाखतीस उपस्थित राहताना ऑनलाईन प्रणालीवर अपलोड केलेल्या सर्व कागदपत्रांच्या मुळ प्रती तसेच त्यांची एक स्वाक्षरीत सत्यप्रत सोबत आणणे बंधनकारक राहील. आवश्यक कागदपत्रे सादर न केल्यास मुलाखतीस अपात्र ठरविण्यात येऊ शकते, याची नोंद घ्यावी.तसेच सर्व संबंधित उमेदवारांना मुलाखतीस येताना १) उमेदवारांचे उच्चतम शैक्षणिक पात्रतेसह १० वी पासुन ते पुढील शिक्षणाची सर्व यादी २) उमेदवार हा पोलीस पाटील यांचा वारस असल्यास त्याबाबतचा पुरावा ३) गृह रक्षक दल (होम गार्ड) मध्ये जाहीरात निघाल्यापासुन १०९५ दिवस (३वर्ष) कार्यरत असल्याचा पुरावा राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी) क्र प्रमाणपत्र/दोन्ही चा पुरावा सादर करावा ४. अतिरिक्त अभ्यासक्रम व उपक्रमामधील प्रमाणपत्र असल्यास मुळ प्रती (  ) सादर करावे तरी संबंधित सर्व उमेदवारांनी सुधारित दिनांका नुसार उपस्थित राहावे, असे आवाहन उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले यांनी केले आहे.

### केएसके महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त ऑनलाइन भौतिकशास्त्र प्रश्नमंजुषा स्पर्धा संपन्न

बीड । प्रतिनिधी

दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ रोजी नवगण शिक्षण संस्था संचलित सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालय बीड, भौतिकशास्त्र विभागाच्या वतीने राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त, राष्ट्रीय ऑनलाइन भौतिकशास्त्र प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्यात आली. यासाठी प्रत्येकी दोन गुणांचे, ५० प्रश्न व ५० मिनिटे वेळ, दि. २८ फेब्रुवारी रोजी दिवसभरात केव्हाही सोडवता येणारी ऑनलाइन स्पर्धा नियोजन करण्यात आले होते. या राष्ट्रीय स्पर्धेमध्ये देशभरातील एकूण ७६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला, यामध्ये कर्नाटक राज्यातील के. एल. ई. बसव प्रभू कोरे महाविद्यालय चिकोडीची कु अक्षता तात्यासाहेब परमनट्टी हिस प्रथम क्रमांक विभागून मिळाला, द्वितीय क्रमांक सौ. के. एस. के. महाविद्यालयाच्या पूजा घोलप, निकिता काशीद, सोनम सानप इत्यादीस विभागून मिळाला, तृतीय क्रमांक समान गुण मिळालेल्या नऊ विद्यार्थ्यांना मिळाला. यामध्ये प्रथम पारितोषिक रुपये ५०० व प्रमाणपत्र, द्वितीय पारितोषिक रुपये ४०० व प्रमाणपत्र, तृतीय पारितोषिक रुपये ३०० व प्रमाणपत्र असे जाहीर केल्याप्रमाणे विभागूण देण्यात आले. कार्यक्रमाचे मुख्य निमंत्रक प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर हे होते, तर प्रा. अशोक डोंगरे व प्रा. रुपेश कोकाटे सर यांनी या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले. सर्व विजयी स्पर्धकांचे आणि भाग घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. योगेश भैय्या क्षीरसागर, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. सुधाकर गुट्टे व डॉ. विश्वंभर देशमाने, प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळानकर उपप्राचार्या डॉ. अनिता शिंदे, पदव्युत्तर संचालक डॉ. ए.एस. खान सर, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. नारायण काकडे यांनी अभिनंदन केले.

## भाकरीचा चंद्र शोधताना दुष्काळी भागातील शेतकऱ्याच्या मुलाने गाठले सीएचे शिखर

आष्टी । शरद रेडेकर

दोन दिवस वाट पाहण्यात गेले, दोन दिवस दुःखात गेले, हिशोब करतो आहे आता किती राहिलेत डोईवर उन्हाळे शेकडो वेळा चंद्र आला, तारे फुलले, रात्र धुंद झाली, भाकरीचा चंद्र शोधण्यात जिंदगी बर्बाद झाली

Narayan Surve यांच्या या ओळी माणसाच्या आयुष्याचा संघर्ष आणि पोटाच्या खळगीसाठी चाललेली धडपड अत्यंत समर्थपणे व्यक्त करतात. सुख–दुःखाच्या माळा गुंफत हिशोब मांडत असताना आयुष्य नकळत पुढे सरकत जाते. प्रत्येक नव्या वर्षासोबत स्वप्नांची नवी उर्मी आणि आशेची नवी दिशा मिळत असते. अशाच जिद्दीने आणि चिकाटीने चालत राहणाऱ्या एका ग्रामीण कुटुंबातील मुलाने आज मोठे यश संपादन केले आहे. आष्टी तालुक्यातील दुष्काळी व डोंगराळ भागातील गहूखेल परिसरात शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या ज्ञानदेव म्हस्के यांच्या घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. पहाडपट्टीसारख्या ग्रामीण भागात जेमतेम शेतीवर उदरनिर्वाह करणेही कठीण होते. मात्र परिस्थितीला न जुमानता त्यांनी दहावीनंतर कौशल्य विकासाच्या माध्यमातून आयटीआयमध्ये इलेक्ट्रिशियनचे शिक्षण घेतले. नोकरीच्या शोधात त्यांनी पुणे व हैदराबादसारखी शहरे गाठली. सध्या ते सुपा येथे एका खाजगी कंपनीत इलेक्ट्रिशियन म्हणून कार्यरत आहेत. ज्ञानदेव म्हस्के यांना दोन मुलगे आहेत. त्यापैकी हर्षल म्हस्के याने मात्र आई–वडिलांच्या कष्टाचे चीज करत त्यांचे स्वप्न पूर्ण केले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत पुण्यासारख्या महागड्या शहरात राहून



त्याने आपले शिक्षण पूर्ण केले. मालानी–सोमानी–चांडक असोसिएट्स, डेक्कन, पुणे येथे त्याची आर्टिकलशिप झाली. कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास आणि आत्मविश्वासाच्या जोरावर त्याने चार्टर्ड अकाउंटंट (सीए) ही कठीण परीक्षा पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण होऊन मोठे यश मिळवले.

**आईचा शिवणकामातून हातभार**

हर्षलच्या आईने शिवणकाम करून कुटुंबाला मोठा हातभार लावला. वडील दिवसरात्र मेहनत करून कुटुंबाचा गाडा ओढत होते, तर आई रात्रंदिवस शिवणकाम करून मुलांच्या शिक्षणासाठी झटत होती. जेमतेम उत्पन्न असतानाही मुलांना उच्च शिक्षण देण्याचा त्यांचा निर्धार कायम राहिला. त्या कष्टांचे फळ आज हर्षलच्या यशातून दिसून आले आहे.

**कोरोनाच्या संकटालाही दिले तोंड**

कोरोना महामारीच्या काळात ज्ञानदेव म्हस्के गंभीर आजारी पडले. उपचारांसाठी मोठा खर्च करावा लागला. आर्थिक आणि मानसिक संकट कोसळले. तरीही त्यांनी हार मानली नाही.

परिस्थिती कितीही कठीण असली तरी मुलांचे शिक्षण थांबता कामा नये, हा त्यांचा ठाम विश्वास होता. दिवस–रात्र मेहनत करून त्यांनी मुलाच्या शिक्षणात खंड पडू दिला नाही.

**शिक्षणाची वाटचाल**

हर्षलने पहिली ते दहावीपर्यंतचे शिक्षण सावेडी येथे पूर्ण केले. अकरावी–बारावीचे शिक्षण अहमदनगर येथे निवासी पद्धतीने घेतले. त्यानंतर बी.कॉम.ची पदवी छ्शु –ीाी उाशीलश रपव डलळशपलश उेश्रश्रशसश –हाशवपरसरी येथून पूर्ण केली. त्यानंतर सीएची परीक्षा उत्तीर्ण होत त्याने मोठे यश संपादन केले.

**शिक्षणातून वैभव निर्माण करता येते**

शिक्षणामुळे जीवनात आमूलाग्र बदल होतो. वडिलांनी प्रतिकूल परिस्थितीतही आम्हाला शिक्षणासाठी खंबीरपणे साथ दिली. त्यांच्या कष्टांची जाणीव ठेवून शिक्षणातून वैभव निर्माण करण्याचा प्रयत्न केला. आई–वडिलांच्या स्वप्नपूर्तीसाठी प्रत्येकाने प्रयत्न केले तर जीवनात कोणतीच कमतरता भासत नाही, असे मत नवोदित सीए हर्षल म्हस्के यांनी व्यक्त केले.

## श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान ते श्रीक्षेत्र पैठण पायी दिंडीचे प्रस्थान

लिंबागणेश । प्रतिनिधी

श्री गुरू ईश्वर बाबा भारती श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान बेलगाव ते श्रीक्षेत्र पैठण पायी दिंडी सोहळ्याचे श्रीसंत शांती ब्रम्ह एकनाथ महाराज षष्ठी निमित्त दरवर्षी प्रमाणे याही वर्षी बीड तालुक्यातील बेलगाव येथील श्री क्षेत्र बेलेश्वर संस्थान ते श्रीक्षेत्र पैठण पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन मठाधिपती ह.भ.प.महादेव बाबा भारती महाराज आणि ह.भ.प. शांतीब्रम्ह तुकाराम महाराज भारती यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. आज दि.०३ मंगळवार रोजी सकाळी श्रीक्षेत्र बेलेश्वर व श्रीगुरु ईश्वर बाबा भारती यांचा अभिषेक करून पायी दिंडीचे प्रस्थान झाले.पायीदिंडीचे हे १२ वे वर्ष असुन मोठ्या संख्येने भाविक यात सहभागी झाले आहेत. टाळ मृदंगाच्या गजरात '' ग्यानबा तुकाराम'' च्या



नामघोषात दंग दिंडीतील भाविकांचे दिंडी मार्गावरील भाविकांनी आकर्षक फुलांनी सजवलेल्या रथामध्ये विराजमान महंत महादेव भारती महाराज व शांती ब्रम्ह तुकाराम महाराज यांची ठिकठिकाणी आतषबाजी करत, सडासमार्जन, रांगोळी काढून सुवासिनींनी पाद्यपुजन करत औक्षण करत मनोभावे स्वागत केले. ग्रामस्थांनी दिंडीतील भाविकांची ठिकठिकाणी चहा पाणी,लिंबु सरबत,नाष्टा यांची सोय करण्यात आली होती.काल दुपारच्या भोजणाची पंगत पिंपरनई ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आली होती. त्यानंतर पायी दिंडी मुक्कामी बेलखंडी गावाकडे मार्गस्थ झाली. पायी दिंडी सोहळा ०३ मार्च ते ११ मार्च दरम्यान पायी दिंडीतील भाविकांना ह.भ.प.दत्ता महाराज वायभट,ह.भ.प. नानाभाऊ भिंगले,ह.भ.प.सुरेश महाराज जाधव,ह.भ.प.रामहरी महाराज येळवे,ह.भ.प.विठ्ठल महाराज बांगर,ह.भ.प.तुकाराम महाराज भोसले,ह.भ.प. बाबासाहेब शिंदे,ह .भ.प. अनंतकाका मुळे यांच्या किर्तनाचा बेलखंडी,बेलुरा,फुल सांगवी,अर्धपिंपरी,मुंगी, याठिकाणीहुन मार्गक्रमण करत असताना लाभ घेता येणार आहे.दि.१० मार्च रोजी पैठण येथे मुक्कामी पोहोचणार आहे.दि.११ मार्च रोजी ह.भ.प. शांतीब्रम्ह भक्तिदास महाराज शिंदे (तुकाराम महाराज संस्थान, ढेकळे महाराज आश्रम बेलखंडी )यांच्या काल्याच्या किर्तनाने सोहळ्याची सांगता होणार आहे.नाथषष्ठी सोहळ्यात भजन, किर्तन,भारूड, संगीत भजन आदी कार्यक्रमांची मेजवानी असते. भाविकांच्या जेवणाची आणि मोफत जेवणाची सोय संस्थानच्या वतीने केली जाते.शांतीब्रम्ह तुकाराम महाराज भारती यांच्या अथक प्रयत्नाने पायी दिंडी सोहळ्याला वेगळे स्वरूप आले असुन पायीदिंडीत सहभागी होणाऱ्या पंचक्रोशीतील भाविकांचा सहभाग वाढत आहे.

## मातृभुमि प्रतिष्ठानच्या वतीने राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्काराने डॉ.सानप सन्मानित



बीड । प्रतिनिधी

मातृभुमि प्रतिष्ठान बीडच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्याना राज्यस्तरीय पुरस्कारानी सन्मानित करण्यात आले यावेळीसमाजरत्न पुरस्कार २०२६हा पुरस्कार सार्वजनिक ग्रंथालय चळवळीत३५ वर्षांपासून स्वतःला वाहून घेणारे. सामाजिक,राजकीय, अध्यात्मिक क्षेत्रात सक्रिय सहभागी असणारे.बीड जिल्हा ग्रंथालय संघाचे माजी अध्यक्ष मराठवाडा विभाग ग्रंथालय संघाचे मा कोषाध्यक्ष, व सध्या महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे सदस्य व श्रीसंत भगवानबाबा व श्रीसंत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी बीडचे अध्यक्ष डॉ राजेंद्र सानप यांना जेष्ठ सामाजिक नेत्या प्रा सुशिलाताई मोराळे.यांच्या हस्ते समाजरत्न.पुरस्कार देवुन सन्मानित करण्यात आले. यावेळी ह.भ प मोहन महाराज खरमाटे, राज्य ऊसतोड कामगार नेते गहिनीनाथ थोरे,इंजि उत्तमराव मिसाळ,प्रा आर टी गर्जे,डॉ संजय तांदळे यांच्यासह असंख्य मान्यवरांच्या उपस्थितीत दि.१मार्च रोजी श्रीसंत भगवानबाबा सामाजिक प्रतिष्ठान येथे वंजारी समाज वधु वर सूचक मेळाव्यात पुरस्कार वितरण करण्यात आले.

बीड जिल्हात शासनाच्या गाव तिथे ग्रंथालय! या धोरणानुसार गावा गावात ग्रंथालय चळवळ उभारली जावी यासाठी गेल्या ३५वर्षापासुन ग्रंथालय क्षेत्रात रचनात्मक कार्य करणाऱ्या ग्रंथप्रेमी डॉ राजेंद्र सानप यांनी गत १४ वर्षांपासून श्रीसंत भगवानबाबा व श्रीसंत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी बीडच्या माध्यमातून १४वार्षिक सप्ताह व ३१३ किर्तनाचे आयोजन करून समाजाला आध्यत्मिक प्रबोधन करण्याचे कार्य केलेआहे. १८वर्षापासुन विना वर्गणी राष्ट्रसंत भगवानबाबा यांचा जन्मोत्सव कार्यक्रम उत्कृष्ट पणेआयोजित करून आदर्श जयंती साजरी करणे बीड शहरात गुरूवर्य भगवान महाराज सार्व वाचनालय इंद्रप्रस्थ कॉलनी बीड चे संस्थापक आहेत या वाचनालयात १२हजार ग्रंथ संपदा वाचनालयाची स्वतहाची पुरेशी इमारत.वाचकाच्या सेवेसाठी उभारून वाचन चळवळ अधिकाधिक वृद्धिंगत केली आहे.विविध सामाजिक क्षेत्रातील योगदानाबद्दल डॉ राजेंद्र सानप यांना अनेक राज्य स्तरीय पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. मातृभुमि प्रतिष्ठानचा राज्य स्तरीय समाजरत्न. पुरस्कारमिळाल्याबद्दल त्यांचे.विविध क्षेत्रातुन त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.या कार्यक्रमास मान्यवरा सह असंख्य समाज बांधव उपस्थितीत होते.

**जिल्हा ग्राहक तक्रार निवारण न्यायमंच**
**बीड जिल्हा कार्यालय**
**शाहूनगर, पांगरी रोड, बीड– ४३१ १२२**
**दिनांक २४ फेब्रुवारी, २०२६**
**जा.क्र.जि.ग्रा.मं./बीड / ३६५**

**जाहिर प्रगटन**

CONSUMER CASE NO. DC/470/CC/280/2025
ASHWINI VIVEKANAND SANAP
Versus
DNYANRADHA MULTISTATE CO OP CREDIT SOCIATY.LTD

To,

**Opposite Party / Respondent Name:**

1. DNYANARADHA MULTISTATE CO OP CREDIAT SOCIETY LTD DNYANRADHA BHAVAN JALNA ROAD, BEED, MAHARASHTRA BEED-431122
2. SURESH DNYANOBA KUTE DNYANRADHA MULTISTATE CO OP CRDIAT SOCIETY LTD CHAMDA FACTORY MIDC BEED TQ.DIST.BEED4, MAHARASHTRA BEED-431122
3. YASHWANT VASANTRAO KULKARNI DNYANRADHA MULTISTATE CO OP CRDIAT SOCIETY LTD BEED DNYANRADHA BHAVAN JALNA ROAD, BEED TQ. DIST.BEED. MAHARASHTRA BEED-431122
4. SUSHIL SHRIRAM HADULE DNYANRADHA MULTISTATE CO OP CRDIAT SOCIETY LTD BEED DNYANARADHA BHAVAN, JALNA ROAD, BEED, MAHARASHTRA BEED-431122
5. AMOL MANE DNYANRADHA MULTISTATE CO OP CRDIAT SOCIETY LTD BEED SARDA SANKUL SUBHASH ROAD BEED, MAHARASHTRA BEED-431122

**जाहिर प्रगटन**

वर नमुद तक्रारदार यांना विरुध्द पक्ष यांच्या विरुध्द ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरुध्द पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झालयामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुमार या जाहिर नोटीस व्दारे आपणास कळविण्यात येते की, विरुध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक ३०/०४/२०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता स्वता. अगर वकिन्न किंवा प्राधिकृत प्रतिनिधि मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरुध्द पक्षांनी याकामी कसूर केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फा आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.

मा. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड यांची आदेशानुसार.
दिनांक २४/०२/२०२६
ठिकाण – बीड

स्वाक्षरीत
**प्रबंधक**
जिल्हा ग्राहक तक्रार
निवारण आयोग, बीड.

## गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या अभिष्टचिंतन निमित्त आरोग्य सप्ताहाचे आयोजन

**माजलगाव । प्रतिनिधी**

अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वर चे पीठाधीश परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या अभिष्टचिंतन निमित्त दि. ५ ते १२ मार्च २०२६ दरम्यान आरोग्य सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. या आरोग्य सप्ताहामध्ये मोफत आरोग्य तपासणी, नाडी परीक्षण शिबीर आयोजित करण्यात आले आहे. मोफत आरोग्यसेवा देण्यासाठी सदगुरू प पू मोरेदादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल त्र्यंबकेश्वर येथील डॉ शेवाळे, डॉ जयेश पाटील उपस्थित राहणार आहेत. दि. १० मार्च रोजी परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज अड कॅन्सर रिसर्च सेंटर माली पारगाव येथे होणाऱ्या महा आरोग्य शिबिराच्या उदघाटन प्रसंगी गुरुपुत्र युवासंत आदरणीय चंद्रकांत (दादासाहेब) मोरे उपस्थित राहणार आहेत. यावेळी महा सत्संग आरोग्य मेळाव्यातून चंद्रकांत मोरे यांचे अमृततुल्य हितगुज, आरोग्य, अध्यात्मिक, सामाजिक, धार्मिक इत्यादी विषयांव अनमोल मार्गदर्शन लाभणार आहे. यानंतर याठिकाणी कॅन्सर, हार्निया, गर्भाशयाचे आजार, पित्ताशयाचे, हायड्रोसील, अपेंडिक्स, अन्जियोप्लास्टी, हाडांच्या शस्त्रक्रिया, सांधे विकार, पंचकर्म, फिजिओथेरपी, वात, कफ, पित्त, अर्धांगवायू, मनक्याचे विकार, कान, नाक व घसा, मधुमेह, रक्तदाब, यासह सर्व आजारांची तपासणी केली जाणार असून, आयुष्मान भारत या योजनेत पात्र असणारे रुग्णांचे मोफत ऑपरेशन करून दिले जाणार आहेत.व पात्र नसलेल्या परंतु शस्त्रक्रियेची आवश्यकता असणाऱ्या रुग्णांची मोफत शस्त्रक्रिया करून दिली जाईल मेडिकलचा व लॅबचा खर्च वैयक्तिक करावा. माजलगाव तालुक्यातील सर्व ठिकाणी होणाऱ्या मोफत आरोग्य तपासणी शिबीरांचा बीड जिल्ह्यासह इतर जिल्ह्यातील रुग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन सदगुरू प पू मोरेदादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल त्र्यंबकेश्वर व समस्त श्री स्वामी समर्थ सेवेकरी परिवाराने केले आहे.

**स्वामी विवेकानंद अर्बन को–ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी. लि. बीड**
रजि. बीएचआर/बीएचआर/आरएसआर/एसआर/४५३/२०२२ दि. २६/०२/२०२६

**विशेष सर्वसाधारण सभेची सुचना (नोटीस)**

संस्थेच्या सर्व सन्माननीय भागधारक सभासदांना कळवण्यात येते की, संस्थेच्या सभासदांची विशेष सर्वसाधारण सभा वार शनिवार दि. १४/०३/२०२६ रोजी सकाळी ठीक ११ वाजता, संस्थेचे मुख्य कार्यालय एच.पी. गॅस एजन्सी समोर, सटवाई मैदान, बीड येथे संस्थेच्या अध्यक्ष सौ. शिवकन्या अशोक राऊत यांचे अध्यक्षतेखाली संस्थेचे मुख्य कार्यालयाचे वरती सभेचे आयोजन करण्यात आले आहे. सभेत खालील विषयावर चर्चा, विचार–विनीमय करुन निर्णय घेण्यात येतील.

तरी संस्थेच्या सर्व भागधारक सभासदांनी विशेष सर्वसाधारण सभेस वेळेवर उपस्थित रहावे, हि विनंती.

**सभेची विषय सुची**

विषय क्र. १) मागील सभेचे इतिवृत वाचन करणे व चर्चा करुन कायम करण्यास मंजुरी देणे.
विषय क्र. २) मा. सहकार आयुक्त व निंबधक सहकार विभाग पुणे यांचे पत्र २९/०७/२०२५ पतसंस्थेसाठी सुधारीत उपविधी लागु करण्यास मान्यता देणे.
विषय क्र. ३) मा. अध्यक्षांचे अनुमतीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करुन निर्णय घेणे, मंजुरी देणे

दिनांक : १४/०३/२०२६

**मा. संचालक मंडळाचे आदेशावरुन**

सभेचे ठिकाण : संस्थेचे कार्यालय बीड ता.जि. बीड
सभेची वेळ :–सकाळी ११ वाजता

**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**सुचना :** वार्षीक सर्वसाधारण सभेस आवश्यक असलेली गणसंख्या जर सकाळी ११ वाजेपर्यंत पूर्ण झाली नाही तर ती सभा पुढे ढकलली जाईल व अशी पुढे ढकलेली सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी सकाळी ११.३० वाजता मुळ विषय पत्रिकेवरील कामकाज पार पाडण्यासाठी घेतली जाईल. त्यासाठी गणसंख्या असणे आवश्यक राहणार नाही.

**सभासदांना नम्र सुचना**

१) सभासदांना वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे काही प्रश्न/ सुचना मांडावयाच्या असतील तर त्यांनी दि. ०८/०३/२०२६ रोजी पर्यंत कामकाजाचे वेळेत नोंदणीकत कार्यालयात लेखी स्वरुपात दयाव्यात.
२) सभेची नोटीस सभासदांचे व्हाटसअॅप क्रमांकावर पाठवण्यात आली आहे.

## पान ६ वरुन...

### पवनचक्कीवर दरोडा टाकणाऱ्या

साथीदार नामे ३) अनिल उर्फ शेड्या आबा काळे रा. खामकरवाडी ता. वाशी जि.धाराशिव (फरार) ४) शिवाजी संजय शिंदे रा. खामकरवाडी ता. वाशी जि.धाराशिव (फरार) ५) अमोल रमेश शिंदे रा. जानकीबार चे पाठीमागे येरमाळा ता. कळंब जि.धाराशिव यांनी मिळुन केल्याची कबुली देवुन पवनचक्कीवर चोरलेली तार विक्री करून त्याचे आम्ही पैसे घेतल्याचे सांगितले. त्यांच्या अंगझडतीमध्ये २०,०००/– रूपये जप्त करण्यात आले आहेत. सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोस्टे पाटोदा हे करीत आहेत. सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत सो, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर सो. यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे, पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, पोउपनि श्रीराम खटावकर, सुशांत सुतळे, पोह/सोमनाथ गायकवाड, पोह/ मारूती कांबळे, पोह/राहुल शिंदे, पोह/बाळु सानप, पोह/आनंद मस्के, पोअ/ अर्जुन यादव, पोअ/अशपाक सय्यद, पोअ/मनोज परजणे, पोअ/विकी सुरवसे, चापोह/वडमारे, चापोअ/हराळे, चापोअ/मांजरे यांनी केली आहे.

### केज नगरपंचायतीत ३.६७

बीड जिल्हाधिकाऱ्यांनी या प्रकरणाचा सखोल तपास करून येत्या ८ दिवसांत सविस्तर अहवाल सादर करावा. अहवाल प्राप्त होताच दोषींवर तातडीने एफआयआर दाखल करण्यात येईल. या घोटाळ्यात सामील असलेल्या सर्व संबंधित कर्मचाऱ्यांना तत्काळ निलंबित केले जाईल. या प्रकरणाची व्याप्ती पाहता, याचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे सोपवण्यात येईल. अपहार केलेली रक्कम संबंधितांकडून व्याजासह वसूल केली जाईल, जेणेकरून पात्र लाभार्थ्यांना त्यांचे घर मिळू शकेल.''गरिबांच्या घरांचे स्वप्न धुळीस मिळवणाऱ्या एकाही दोषीला पाठीशी घातले जाणार नाही. हा सार्वजनिक पैशांचा अपहार असून संबंधितांवर कठोर कारवाई निश्चित आहे. विधानसभेत या प्रकरणावर शिक्कामोर्तब झाल्यामुळे केज नगरपंचायतीसह बीड जिल्ह्याच्या प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. आता सर्वांचे लक्ष जिल्हाधिकाऱ्यांच्या अहवालाकडे आणि त्यानंतर होणाऱ्या अटकेच्या कारवाईकडे लागले आहे.

### बीड येथे होणार स्व. खाशाबा

असून ग्रामीण आणि शहरी भागातील अनेक होतकरू मल्लांना आपल्या ताकदीचे व कौशल्याचे प्रदर्शन करण्यासाठी मोठे व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. तसेच युवा पिढीमध्ये पारंपरिक मातीतील कुस्तीबद्दल नव्याने प्रेरणा निर्माण होण्यासही मोठी मदत होणार आहे. जिल्ह्यात ही प्रतिष्ठेची स्पर्धा आयोजित होणार असल्याने जिल्ह्यातील क्रीडाप्रेमी, मल्ल आणि कुस्ती परंपरेशी जोडलेल्या नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. मागणीची दखल घेऊन सकारात्मक भूमिका घेतल्याबद्दल ना. सुनेत्राताई अजितदादा पवार यांचे माजी आमदार भीमराव धोंडे यांनी आभार मानले आहेत.

### राजाभाऊ फडचे डोके

पण या अहवालांमधून आपल्याकडे काही माहिती लीक झाली असल्याचा दावा जर राजाभाऊ फड करत असतील तर ते गृह विभागाच्या तपासातील कार्य पद्धतीवर संशय निर्माण करणारे तसेच दखलपात्र गुन्हा देखील आहे. त्यामुळे राजाभाऊ फड याला या प्रकरणात आता सहआरोपी करण्यात यावे, अशी मागणीही यावेळी करण्यात आली. परळीच्या थर्मलला लुटून खाणाऱ्या आणि प्रत्येक विकासाच्या कामात खोडा घालणाऱ्या राजाभाऊ फड याला खरेतर चांगल्या मानसोपचार तज्ञांकडे जाऊन उपचार घेण्याची गरज आहे. किंबहुना राजाभाऊ फड याला त्याच्या निकटवर्तीयांनी चांगल्या मानसोपचार तज्ञांकडे दाखल करावे, आपण त्याचा संपूर्ण खर्च करायला तयार आहोत, अशा शब्दात राजाभाऊ फड यांच्या बेताल वक्तव्याचा समाचार मुंडे समर्थकांनी घेतला.

मागील काही महिन्यांपासून आ. धनंजय मुंडे यांना सॉफ्ट टार्गेट ठरवून रोज उठून नवनवीन आरोप करून त्यांना बदनाम करण्याचे एक मोठे षडयंत्र सध्या सुरू आहे. राजाभाऊ फड देखील याच षड्यंत्राचा खालून पहिला प्यादा आहे. पण आता मात्र असे बिनबुडाचे आरोप सहन केले जाणार नाहीत. राजाभाऊ फड यांच्या विरोधात कायदेशीर अब्रुनुकसानीचा फौजदारी खटला दाखल करणार आहोत, असेही यावेळी नमूद करण्यात आले.

तुमच्या प्रदेश उपाध्यक्षाला हजर करा

राजाभाऊ फड याचा जिवलग सहकारी व शरद पवार गटाचा प्रदेश उपाध्यक्ष बबन गित्ते हा अट्टल गुन्हेगार सरपंच स्व. बापू आंधळे याला भरदिवसा गोळ्या घालून फरार झालेला आहे, त्याला आता दीड वर्ष लोटत आलेत. दुसऱ्यांच्या नावाने तोंडाच्या वाफा काढण्याआधी आपल्या पक्षाच्या नेत्याला आधी पोलिसांच्या समोर हजर करा. बापू आंधळे यांच्या हत्येचे वास्तव समोर येऊद्या. मुळात राजाभाऊ फड हे एक गुत्तेदार राजकारणी आहेत. प्लॉटिंग वगैरे त्यांचेही अनेक व्यवसाय आहेत. स्थानिक कन्हेरवाडी गावात त्यांचेही स्व. महादेव मुंडे यांच्या सोबत वाद होते, पोलिसांनी राजाभाऊ फड याची चौकशी केली आहे का? राजाभाऊ फडच्या नावाचे थर्मल पासून ते श्री वैद्यनाथ देवस्थानाच्या कामात मोठे दिवे लागलेले आहेत. प्रभू वैद्यनाथ देवस्थानाच्या कामात त्रिशूळ – डमरू असलेले पोल लावायचे कंत्राट घेतले, त्यातले पोल या व्यक्तीने अगदी स्वतःच्या खाजगी पेट्रोल पंपावर बसवले आहेत, हे संपूर्ण परळीच्या जनतेने उघडपणे पाहिले आहे; अशा व्यक्तींची विश्वासार्हता किती आहे, हे माध्यमांनी तपासले पाहिजे. दहा खून केले, अमुक केले, तमुक केले असे तोंडाला येईल ते बोलताना आधी डोके ठिकाणावर आहे का तपासून बघा. ज्या खटल्यांचे निकाल न्यायालयाने देऊन दहा वर्षे उलटली त्या खटल्यात मुंडे साहेबांचे नाव घेणाऱ्या व्यक्तीस चांगल्या डॉक्टरला दाखवा, असा सल्लाही त्यांनी दिला. या पत्रकार परिषदेस ज्येष्ठ नेते प्रा. डॉ. मधुकर आघाव, परळी बाजार समितीचे सभापती सूर्यभान नाना मुंडे, अॅड. गोविंद फड, शिवाजी शिरसाट, बालाजी (पिंटू) मुंडे, वैजनाथराव सोळंके, नितीन निर्मळ पाटील, अमर गित्ते पाटील, शंकर कापसे पाटील, सुनील नाना फड, शरद मुंडे, यांसह पदाधिकारी, नगरसेवक आदी उपस्थित होते.

### बीडमध्ये नऊ दिवस

ड.दीपक काका कुलकर्णी, संपादक दिलीपराव खिस्ती, श्री संजयराव खंदाट साहेब,हेमंत गोदिकर महाराज,सागर देशपांडे यांनी विविध समित्या आणि कार्यक्रम रूपरेषा संदर्भात मार्गदर्शन करून हे देखणे आणि पावनपर्व ,सर्व शक्तीने साजेसे साजरे करण्यासाठी आणि सर्वांचा सहभाग ,लाभ होण्यासाठीचे मार्गदर्शन केले. यावेळी मोठ्या संख्येने युवारामभक्त, धर्मप्रेमी बंधू –भगिनी, नागरिकांची उपस्थिती होती.

# अतिवृष्टीच्या नुकसानीपोटी ९ हजार कोटी मंजूर

## आर्थिक पाहणी अहवालात सरकारची माहिती

मुंबई : राज्यात जून ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे पिकांचे मोठे नुकसान झाले होते. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी सरकारने मदत जाहीर केली होती. एकूण १ कोटी १६ लाख शेतकऱ्यांना ९ हजार २२ कोटी नुकसानीची मदत देण्यात आल्याचे आर्थिक पाहणी अहवालात म्हटले आहे.

राज्याचा २०२५-२६ चा आर्थिक पाहणी अहवाल गुरूवारी (दि.५) विधिमंडळात मांडण्यात आला. शेती आणि संलग्न कार्य जसे की पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, मत्स्यव्यवसाय आणि वनीकरण राज्याच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वाची भूमिका बजावतात. हे क्षेत्र लोकसंख्येच्या मोठ्या घटकाला, विशेषतः ग्रामीण भागातील जनतेला उपजीविका व रोजगार उपलब्ध करून देते आणि अन्न व पोषण सुरक्षा सुनिश्चित करण्यामध्ये मोलाचे योगदान देते. अन्न सुरक्षा, रोजगार आणि ग्रामीण विकासामध्ये शेतीची भूमिका महत्वाची आहे. मात्र, हवामान बदल, जमीन आणि पाण्याची टंचाई, निविष्ठांचा (बियाणे, खते इ.) वाढता खर्च आणि बाजारपेठेतील अनिश्चितता यांमुळे शेतीसमोर आव्हाने वाढत आहेत, अशी नोंद आर्थिक पाहणी अहवालात करण्यात आली आहे. बदलत्या




हवामानाचा सामना करण्यासाठी सरकार उत्पादन वाढविणे, हवामान बदलास अनुकूल व शाश्वत शेतीला चालना देणे, सिंचन व्यवस्था आणि जलसंधारणात सुधारणा करणे तसेच शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे यांसाठी विविध योजना राबवित आहे. त्याच प्रमाणे शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरासाठी प्रोत्साहित करणे, शेतकरी गटांना बळकट करणे आणि बाजारपेठ उपलब्धतेत सुलभता आणणे या सारखेही प्रयत्न केले जात आहेत, असेही आर्थिक पाहणी अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे. राज्यात यंदा पाऊसमान चांगले राहीले. मात्र पिकांचे नुकसानही झाल्याचे म्हटले आहे. राज्यात सरासरी पावसाच्या तुलनेत राज्यात १०९.१ टक्के पाऊस झाला. राज्यातील एकूण ३५५ तालुक्यांपैकी १४९ तालुक्यांमध्ये सरासरीपेक्षा जास्त पाऊस, १८१ तालुक्यांमध्ये सरासरी पाऊस आणि २५ तालुक्यांमध्ये सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला, अशी नोंद करण्यात आली आहे.

खरिपात ९५ लाख हेक्टरवर नुकसान

जानेवारी ते मे २०२५ या कालावधीत अवेळी पाऊस व गारपीटीमुळे पिकांचे नुकसान झाले होते. या नुकसानीसाठी एकूण चार लाख शेतकऱ्यांना सुमारे १.८७ लाख हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ३३७.४२ कोटी रुपये नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली आहे. तसेच जून ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे राज्यभरात पिकांचे नुकसान झाले होते. या झालेल्या नुकसानीसाठी एकूण १ कोटी १६ लाख शेतकऱ्यांना ९४ लाख ८२ हजार हेक्टरसाठी मदत मंजूर केली आहे. बाधित क्षेत्रासाठी ९ हजार २२ कोटी नुकसानीची मदत देण्यात आल्याचे आर्थिक पाहणी अहवालात म्हटले आहे.

## लाळ्या खुरकुत रोगास प्रतिकारक लाल सिंधी गाय



भारतात दूध उत्पादनासाठी प्रसिद्ध असलेल्या गायींच्या जातीत लाल सिंधी गायीला विशेष महत्व आहे. मुख्यत: दूध उत्पादनासाठी वापरल्या जाणाऱ्या या गायींची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहेत. जाणून घेऊ या गायीच्या जातीविषयी माहिती.

उगम : या गायीचा उगम पाकिस्तान येथील कराची तसेच भारतातील हैद्राबाद, बिकानेर येथे झाला आहे. सध्या ही गाय हरियाणा, कर्नाटक, केरळ, ओडिशा आणि पंजाब मध्येही मोठ्या प्रमाणात पाळली जाते. यूपी आणि बिहारमधील काही शेतकरी या गायींच्या संगोपनाचे कामही करत आहेत. ऑस्ट्रेलिया, श्रीलंका ब्राझील आणि अमेरिका या देशातही या जाती आढळतात.

शरीर रचना : या जातीच्या गायीचे शरीर गडद ते फिकट लाल रंगाचे असते. त्यांच्या शरीरावर पांढरे पट्टेही दिसतात. लाल सिंधी जातीची गाय मध्यम आकाराची असते. सिंधी गायीचे डोके रूंद, शिंगे लहान व जाड, शेपटी लांब व पाय लहान असतात. या जातीच्या गायीचे सरासरी वजन ३.१५ क्विंटल आणि उंची सुमारे ११५ सें. मी. बैलाचे सरासरी वजन ४.५ क्विंटल आणि उंची सुमारे १३२ सेमी असते.

प्रजोत्पादन आणि उत्पादन : या गायीचा प्रथम माजावर येण्याचा कालावधी हा ३९ ते ५० महिन्याचा असतो. दूध देण्याचा कालावधी २७० दिवस असून सरासरी दूध उत्पादन ११८८ ते १६७५ लिटर आहे. ही गाय एका दिवसात ६ ते ८ लिटर दूध देते.

इतर विशेषता : या गायीचे सरासरी आयुष्य १५ वर्षांचे असते. उष्णता, टिक प्रतिकार, रोग प्रतिकार, उच्च तापमानात प्रजनन इत्यादी सहन करण्याच्या क्षमतेमुळे लाल सिंधी गायी शतकानुशतके वापरली गेली आहे. लाल सिंधी गुरांचे संगोपन प्रामुख्याने भारतात दुग्धशाळेच्या जाती म्हणून केले जाते. पण इतर देशांमध्ये ते मांसासाठी देखील वाढवले जाते. या गायीची थायलेरीयासिस आणि लाळ्या खुरकुत रोगासाठी चांगली रोगप्रतिकारशक्ती असते. बैल शेती व वाहतुकीच्या कामासाठी उपयुक्त असतात. ती आकाराने लहान व बदलत्या हवामानाशी समरस होऊ शकतात.

## गायींना हिरव्या चाऱ्यासोबतच, सुखा चाराही द्या; नाहीतर होईल नुकसान!

राज्यात प्रामुख्याने शेतकरी दुग्ध व्यवासाय करण्यावर अधिक भर देत आहे. मात्र, दुग्ध व्यवसायातील बारकावे लक्षात न घेतल्यामुळे शेतकऱ्यांना दूध उत्पादनातील घटीला सामोरे जावे लागते. सध्या उन्हाळ्याचा काळ सुरु असून, काही शेतकऱ्यांकडे पाणी उपलब्ध असल्यास ते मोठ्या प्रमाणात हिरवा चारा दुधाळ गायींसाठी उत्पादित करत असतात. मात्र, दररोज दुधाळ जनावरांना नियमित केवळ हिरवा चारा द्यावा का? किंवा मग अन्य कोणत्या पद्धतीने चाऱ्याचे नियोजन करणे गरजेचे आहे याबाबत माहिती घेतल्यास सुखा चाऱ्याचे महत्व लक्षात येते.

पाण्याचे प्रमाण अधिक : काही शेतकऱ्यांकडे बोअरवेलला किंवा शेततळयाचे पाणी असल्यास त्यांच्याकडे मोठ्या प्रमाणात उन्हाळाभर हिरवा चारा असतो. ज्यामुळे शेतकरी नेहमीच आपल्या जनावरांना हिरवा चारा टाकताना दिसून येतात. मात्र, हे पूर्णतः चूकीचे असल्याचे पशुतज्ज्ञांनी म्हटले आहे. पशुतज्ज्ञांच्या माहितीनुसार, हिरव्या चाऱ्यामध्ये मोठ्या प्रमाणात पाण्याचे प्रमाण आढळते. ज्यामुळे नियमित हिरवा चारा खाल्याने दुधाळ जनावरास पोटफुगी, डायरिया किंवा मग अन्य रोगांचा सामना करावा लागू शकतो.



दुधाला फॅट न मिळणे : पशुतज्ज्ञांच्या माहितीनुसार, केवळ हिरव्या चाऱ्यामुळे शेतकऱ्यांच्या दूध उत्पादनाल देखील फटका बसू शकतो. यामध्ये प्रामुख्याने दुधाच्या गुणवत्तेमध्ये मोठी घट दिसून येते. अर्थात शेतकऱ्यांना दुधाला फॅट मिळणार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना दुधाळ जनावरास एखाद्या कंपनीचे प्रमाणित खनिजे मिश्रण आणि सुखा चारा देखील नियमित दिला पाहिजे. ज्यामुळे दुधाळ जनावरांचे आरोग्य ठीक राहून, दुधाची गुणवत्ता देखील मिळते.

पोटफुगी झाल्यास : कधी-कधी दुधाळ जनावर हिरवा चारा टाकल्यानंतर अधाश्याप्रमाणे सर्व चारा खात राहते. मात्र, त्यामुळे दुधाळ गायीला किंवा म्हशीला पोटात जंत किंवा पोटफुगी होण्याचा धोका संभवतो. अशावेळी शेतकऱ्यांनी गायीला अर्धा किलो मोहरी तेलात ५० ग्रॅम तारपीन या वनस्पतीचे तेल पाजावे. याशिवाय काही दिवस संबंधित गायीला किंवा म्हशीला हिरवा चारा उन्हात थोडासा वाळवून खायला द्यावा. ज्यामुळे त्यातील पाण्याचे प्रमाण कमी राहून, पोटफुगी झालेल्या जनावरास आराम पडण्यास मदत होईल. असेही पशुतज्ज्ञांचे म्हणणे आहे.

## साठवणुकीत असलेल्या मूग, तूर, हरभराची अशी घ्या काळजी

कडधान्य साठवणुकीदरम्यान किडींचा प्रादुर्भाव होणे ही शेतकऱ्यांसाठी मोठी अडचण ठरते. अनेक वेळा शेतात चांगले उत्पादन घेऊनही साठवणुकीत योग्य काळजी न घेतल्यामुळे मोठे नुकसान होते. कडधान्याला लागणारी कीड ही केवळ साठवणुकीत निर्माण होत नाही, तर तिची सुरुवात पिक शेतात असतानाच होते.

अशी होते कडधान्याला कीड लागण्याची सुरुवात :

पीक परिपक्क झाल्यानंतर भुंगेरे शेंगा किंवा दाण्यांवर अंडी घालतात. कापणी व मळणी करताना ही अंडी किंवा अळ्या धान्यासोबत साठवणुकीत जातात. साठवणुकीदरम्यान अंडी उबून अळ्या बाहेर येतात आणि त्या दाण्यांच्या आत शिरून त्यावर उपजीविका करतात. त्यामुळे दाणे आतून पूर्णपणे पोखरले जातात आणि खाण्यायोग्य राहत नाहीत. साठवणुकीच्या ठिकाणी असलेल्या भेगा, फटी, जुनी पोती, गोदामाचे कोपरे यामध्ये हे भुंगेरे लपून राहतात. नवीन धान्य साठवले की हे किडे लगेच त्यावर हल्ला करतात. तसेच बैलगाडी, ट्रेलर, ट्रॅक्टर ट्रॉली अशा वाहतुकीच्या साधनांमधूनही या किडींचा प्रसार होतो. त्यामुळे साठवणूक जागा स्वच्छ नसल्यास किडींचा धोका अधिक वाढतो.इतर



धान्यांच्या तुलनेत कडधान्यांना किडींचा प्रादुर्भाव जास्त होतो. मूग, उडीद, तूर, हरभरा, चवळी, वाटाणा या कडधान्यांवर भुंगेऱ्यांचा विशेष हल्ला दिसून येतो. कॅलासोब्रुकस जातीचा भुंगेरा हरभरा व चवळीमध्ये प्रचंड नुकसान करतो. मादी भुंगेरा साधारणतः ८० ते ९० अंडी एकेक करून दाण्यावर घालतो. अंडी ४ ते ५ दिवसांत उबतात. अळी अवस्था १५ ते २० दिवसांची असते, तर कोषावस्था दाण्याच्या आतच ४ ते ८ दिवसांत पूर्ण होते. पूर्ण वाढलेला भुंगेरा दाण्यात छिद्र पाडून बाहेर येतो. प्रौढ भुंगेरा सुमारे १० दिवस जिवंत राहतो. त्याला पंख असल्यामुळे तो कोठारातून उडून पुन्हा शेतात जातो आणि कापणीपूर्वी किंवा कापणीनंतर पुन्हा अंडी घालतो. त्यामुळे किडींचा जीवनचक्र सतत सुरू राहतो.

कीड लागू नये काळजी : कडधान्य शेतात असतानाच योग्य काळजी घेणे फार महत्वाचे आहे. कापणीनंतर धान्यातील ओलावा अनेकदा १५ टक्क्यांपेक्षा जास्त असतो. त्यावेळी तापमान साधारण ३० अंश सेल्सिअस आणि हवेतील आर्द्रता ७५ टक्क्यांपेक्षा जास्त असते. हे वातावरण कीड आणि बुरशी वाढीसाठी अतिशय पोषक असते. त्यामुळे तूरसारखी कडधान्ये टणक होतात आणि शिजण्यास वेळ लागतो. तूर पेंड्या शेतात किंवा खळ्यात उभ्या करून, थोड्या सैल बांधून ठेवाव्यात. त्यामुळे हवा खेळती राहते आणि धान्य लवकर वाळते. उडीद, मूग, चवळी यांसारखी पिके ज्या पेंड्या बांधता येत नाहीत, ती कोरड्या व उंच जागी पसरून ठेवावीत आणि वेळोवेळी उलटणी करावी.खरीप हंगामात मूग व उडीद कापणीवेळी वातावरण ओलसर असल्याने नुकसान जास्त होते. ते टाळण्यासाठी शेतात गरजेनुसार ओटे तयार करून त्यावर तात्पुरते तंबू किंवा प्लास्टिक आच्छादन करणे उपयुक्त ठरते. योग्य साठवणूक व काळजी घेतल्यास कडधान्याचे मोठे नुकसान टाळता येते.

## दिन विशेष

### जागतिक दिवस:
### स्वांतत्र्य दिन : घाना.
### अलामो दिन : टेक्सास.

### महत्वाच्या घटना

१८४० : बाल्टिमोर कॉलेज ऑफ डेंटल सर्जरी हे पहिले दंतवैद्यकीय महाविद्यालय सुरू झाले

१९०२ : रेआल माद्रिद फुटबॉल क्लब ची स्थापना झाली.

१९१५ : राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि रवींद्रनाथ टागोर शांतीनिकेतन येथे पहिल्यांदा भेटले.

१९२१ : पोतुर्गाली कम्युनिस्ट पार्टी ची स्थापना करण्यात आली.

१९४० : रशिया व फिनलंड मधे शस्त्रसंधी झाली.

१९५३ : मराठीतील श्रेष्ठ नाटककार आचार्य अत्रे यांनी 'श्यामची आई' हा चित्रपट पडद्यावर आणला.

१९५७ : घाना देशाचा स्वातंत्र्य दिन.

१९६४ : कॅशियस क्ले यांनी मुहम्मद अली ये नाव धारण केले.

१९७१ : भारतीय क्रिकेटपटू सुनील गावस्कर यांनी वेस्ट इंडीज विरुद्ध पहिला कसोटी सामना खेळला.

१९७५ : इराण व इराक यांच्यात सीमाप्रश्नावर संधी झाली.

१९८३ : आजच्या दिवशी १९८३ ला युनाटेड स्टेट ने पहिल्या फुटबॉल लीग ची स्थापना केली.

१९९० : भारताने इंदिरा गांधी गोल्ड कप हॉकी टूर्नामेंट चा खिताब आपल्या नावावर केला.

१९९१ : भारताचे माजी पंतप्रधान चंद्रशेखर राव यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला.

१९९२ : 'मायकेल अँजेलो' नावाचा संगणक विषाणू पसरण्यास सुरूवात झाली.

१९९८ : विख्यात गझलगायक जगजितसिंग यांना मध्यप्रदेश सरकारतर्फे दिला जाणारा 'लता मंगेशकर पुरस्कार' जाहीर

१९९९ : जगप्रसिद्ध खजुराहो मंदिर समुहाच्या सहस्राब्दी सोहळ्याचे राष्ट्रपती के. आर. नारायणन यांच्या हस्ते उद्घाटन

२००० : शहर निर्वाह भत्ता, महागाई भत्ता आणि घरभाडे भत्ता म्हणून मिळणारी रक्कम करपात्र असल्याचे सर्वोच्च न्यायालयाचे शिक्कामोर्तब

२००५ : देशातील पहिला अणुउर्जा प्रकल्प तारापूर येथे सुरु झाला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४७५ : मायकेल अँजेलो – इटालियन शिल्पकार आणि चित्रकार (मृत्यू: १८ फेब्रुवारी १५६४)

१५०८ : मुघल सम्राट अकबर जलालुद्दीन चे वडील हुमायु चा जन्म.

१७८७ : जर्मनीचे भौतिकशास्त्रज्ञ जोसेफ वॉन फ्रॉनहोफर यांचा जन्म.

१८९९ : चरित्रकार आणि संपादक शि. ल. करंदीकर यांचा जन्म.

१९१५ : बोहरी धर्मगुरू सैयदना मोहम्मद बर्हानुद्दिन यांचा जन्म.

१९३३ : भारतीय चित्रपट अभिनेत्री कृष्णा कुमारी यांचा जन्म.

१९४९ : शौकत अजिझ – पाकिस्तानी राजकारणी

१९५७ : अशोक पटेल – भारतीय क्रिकेट खेळाडू.

१९६५ : देवकी पंडीत – गायिका

१९८६ : प्रसिद्ध भारतीय गायक अंकित तिवारी यांचा जन्म.

१९९७ : भारतीय चित्रपट अभिनेत्री जानव्ही कपूर चा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९४७ : ब्रिटीश भूराजनीतिज्ञ आणि राजकारणी मकिंडर हॉलफोर्ड जॉन यांचे निधन.

१९६६ : रामपूर चे नवाब रझा अली खान बहदूर यांचे निधन.

१९६७ : कर्तबगार प्रशासक स. गो. बर्वे यांचे निधन.

१९६८ : साहित्यिक नारायण गोविंद चापेकर उर्फ ना. गो. चापेकर यांचे निधन.

१९७३ : नोबेल पारितोषिक विजेत्या अमेरिकन लेखिका पर्ल एस. बक यांचे निधन. (जन्म: २६ जून १८९२)

१९८१ : गो. रा. परांजपे – मराठीतील आघाडीचे विज्ञान प्रसारक, नामवंत शास्त्रज्ञ, 'रॉयल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स'चे पहिले भारतीय प्राचार्य

१९८२ : रामभाऊ म्हाळगी – राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ प्रचारक, जनसंघ या राजकीय पक्षाचे महाराष्ट्राचे पहिले सरचिटणीस आणि विधानसभेतील पहिले आमदार, तसेच भारतीय जनता पक्षाच्या महाराष्ट्राचे पहिले प्रादेशिक अध्यक्ष

१९९२ : प्रसिध्द कादंबरीकार रणजित देसाई – कर्तबगार प्रशासक स.गो.बर्वे.

१९९५ : दक्षिण भारतात हिंदी भाषेचे प्रचारक मोटूरि सत्यनारायण यांचे निधन.

१९९९ : सतीश वागळे – हिन्दी आणि मराठी चित्रपट निर्माते

२००० : नारायण काशिनाथ लेले – कृष्ण यजुर्वेद शाखेतील वेदमूर्ती

२००६ : भारतीय चित्रपट दिग्दर्शक के शंकर यांचे निधन.

## रांगडा कांदा वाळविण्याची पद्धत आणि फायदे


रांगडा कांदा लागवडीपासून (सप्टेंबर-ऑक्टोबर) सुमारे ११० ते १२० दिवसांत (जानेवारी-मार्च) काढणीस तयार होतो. कांदाकाढणीला आल्यांनतर काही लक्षणे दिसून येतात. त्यानुसार शेतकऱ्यांनी कांदा काढणीला सुरवात करावी.

रांगडा कांदा काढणी : पिकाची वाढ पूर्ण होऊन, पाने पिवळी पडून माना पडू लागल्याबरोबर काढण्यापूर्वी १५ ते २० दिवस आधी पाणी देणे बंद करावे. त्यामुळे कांदा पक्क होण्यास मदत मिळते. कांदे घट्ट होतात, वरचा पापुद्रा सुकू कांद्याला काढणीच्या वेळेस इजा होत नाही. कांद्याच्या ५० ते ७० टक्के माना पडल्यानंतर काढणी करावी. पाने जास्त वाळू न देता कांदा उपटून काढावा. अन्यथा मान जास्त वाळली, तर ती कांदा उपटताना तुटतेय परिणामी कांदा कुदळीने किंवा खुरप्याने खोदून काढावा लागतो, त्यामुळे खर्च वाढतो. कांदा काढल्यानंतर तो शेतामध्ये पातीसह दोन ते तीन दिवस सुकण्यास पडू द्यावा. प्रत्येक वाफ्यातील कांदा अशा रीतीने ठेवावा, की दुसरी ओळ पहिल्या ओळीचा फक्त कांदा झाकेल आणि पात उघडी राहील. तीन दिवस शेतामध्ये सुकल्यानंतर कांद्याची पूर्ण सुकलेली पात २ ते २.५ सेंमी लांब नाळ (मान) ठेवून कापावी. नंतर जोडकांदे, डेंगळे आलेले कांदे आणि चिंगळी कांदे काढून टाकावेत. उर्वरित चांगले कांदे गोळा करून सावलीत दहा ते बारा दिवस राहू द्यावेत. या काळात कांद्याच्या माना वाळून पिरगळतात, तसेच वरचा पापुद्रा वाळून कांद्याला घट्ट चिकटतो. वाळलेल्या भागातून रोगजंतूंचा कांद्यात सहज प्रवेश होत नाही.




राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत
शुक्रवार दि.६ मार्च २०२६






# सौर प्रकल्प बसवूनही लाखोंची बिले, महावितरण कार्यालयामध्ये ठिय्या

## लाखोंची थकबाकी दाखवून वीज तोडण्याचा इशारा दिल्याने शेतकरी आक्रमक

अहिल्यानगर । प्रतिनिधी

शासनाच्या सौर ऊर्जा योजनेवर विश्वास ठेवून लाखो रुपयांची गुंतवणूक करणाऱ्या शेतकऱ्यांनाच अवाजवी वीजबिलांचा फटका बसत असल्याची प्रकरणे जिल्ह्यात समोर आली आहेत. सौर प्रकल्प बसवल्यानंतर वीजबिलात बचत होण्याऐवजी उलट लाखोंची थकबाकी दाखवून वीजपुरवठा खंडित करण्याचे इशारे दिले जात असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी महावितरणच्या ग्रामीण उपविभागीय कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन छेडून संबंधित प्रकरणांची तातडीने तांत्रिक चौकशी करण्याची मागणी केली. टाकळी काझी येथील शेतकरी श्रीमंत उर्फ सचिन म्हस्के यांनी महावितरणची परवानगी घेऊन ३ किलोवॅट क्षमतेचा सौर प्रकल्प उभारला. सौर ऊर्जेमुळे वीजबिलात मोठी घट होण्याची अपेक्षा असताना, त्यांना उलट हजारोंची थकबाकी दाखवून अवाजवी बिल पाठवण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. थकबाकी न भरल्यास



वीजपुरवठा खंडित करण्याचा इशाराही देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. देवगाव येथील शेतकरी गुलाब मोहन वामन यांनी सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून ३ किलोवॅट सौर प्रकल्प बसविला. मात्र त्यांना ४ लाख ३२ हजार रुपयांचे अविश्वसनीय व तांत्रिकदृष्ट्या अशक्यप्राय बिल पाठवण्यात आले.शेतकऱ्यांच्या मते, नेट-मीटरिंगची योग्य वजावट न करणे, मीटर रीडिंगची अचूक तपासणी न करणे आणि प्रणालीतील त्रुटी वेळेत दुरुस्त न करणे या बाबींमध्ये गंभीर निष्काळजीपणा झाला आहे. सौर योजनेचा मुख्य उद्देश वीजबिलात बचत करणे हा असताना, उलट थकबाकी दाखवणे हे नियमबाह्य व योजनेच्या उद्देशालाच हरताळ फासणारे असल्याचा आरोप करण्यात आला.

अवाजवी व चुकीची बिले तात्काळ रद्द करण्यात यावीत. वीजपुरवठा खंडित करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. जिल्हास्तरावर नेट-मीटरिंग संदर्भात विशेष तपासणी समिती स्थापन करावी, अशी मागणी यावेळी शेतकऱ्यांनी केली.या वेळी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश पोटे व शेतकरी उपस्थित होते. जिल्हा प्रशासन व महावितरणने या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष देऊन सौर योजनेंवरील विश्वास अबाधित ठेवावा, अशी मागणी आंदोलकांनी केली आहे व बिल कमी करून देण्यात यावे अन्यथा अधिकाऱ्यांना काळे फासून आंदोलन करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

महावितरण बिलांत कपात करण्याची कार्यवाही करणार सौर प्रकल्प बसवणाऱ्या शेतकऱ्यांवर लाखोंची बिले लादून त्यांना आर्थिक संकटात ढकलण्याचा प्रयत्न आम्ही सहन करणार नाही. ही प्रकरणे मार्गी लावली नाहीत तर तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे. दरम्यान, महावितरणच्या ग्रामीण उपविभागीय कार्यालयातील अधिकाऱ्यांसोबत चर्चा करण्यात आली. चर्चेनंतर संबंधित बिलांत कपात करण्याची कार्यवाही करण्यात आल्याची माहिती आंदोलनकर्त्यांनी दिली.

# पाटोदा आरोग्य केंद्रात रुग्णांची गैरसोय!

## वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मनमानी वेळापत्रकामुळे आरोग्य बिघडले

मंठा । प्रतिनिधी

मंठा तालुक्यातील पाटोदा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या मनमानी वेळापत्रकामुळे आरोग्य विभागाचे आरोग्यच बिघडले की काय ? अशी शंका उपस्थित केली जात आहे. येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या नवीन इमारतीचा लोकार्पण सोहळा मोठ्या थाटामाटात संपन्न झाला असला तरी या इमारतीचे अद्याप आरोग्य विभागाकडे हस्तांतरण न झाल्यामुळे सध्या जुन्या इमारतीमध्येच प्राथमिक केंद्र सुरू आहे.

येथील वैद्यकीय अधिकारी ओपीडी करिता दुपारनंतर उपलब्ध नसल्यामुळे रुग्णांची कुचंबना होत असून अनेक रुग्णांना उपचाराविना परत जावे लागत आहे. याविषयी स्थानिक नागरिकांनी अनेक वेळा तालुका आरोग्य अधिकारी यांच्याकडे तोंडी तक्रारी केल्या. येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांना आरोग्य विभागाच्या नियमाप्रमाणे पूर्ण दिवस आरोग्य केंद्रात




थांबून रुग्णांना सेवा देण्याबाबत वरिष्ठ कार्यालयाने आदेशित करावे अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे. या आरोग्य केंद्रात काही सुज्ञ नागरिकांनी तक्रार पुस्तिकेची मागणी केली असता या आरोग्य केंद्रात तक्रार पुस्तिका उपलब्ध नाही असे सांगितले जाते. रुग्णांच्या आरोग्याशी खेळ या आरोग्य केंद्रातून मांडला जात असून मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद जालना, जिल्हा आरोग्य अधिकारी जालना आणि तालुका आरोग्य अधिकारी यांनी तात्काळ लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे.

# थकीत जीएसटीसाठी व्यापाऱ्याची मालमत्ता जप्त




छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

एक कोटी एक्क्यांशी लाख रुपयांच्या थकीत जीएसटी वसुलीसाठी गंगापूर येथील एका व्यापाऱ्याची स्थावर मालमत्ता जप्त करण्याची कारवाई राज्य वस्तू व सेवा कर विभागाकडून करण्यात आली आहे. या व्यापाऱ्यास वारंवार नोटीस बजावूनही कराचा भरणा न केल्याने अखेर जप्तीची कारवाई केल्याची माहिती अपर राज्यकर आयुक्त अभिजीत राऊत यांनी दिली.

राज्य वस्तू व सेवा कर विभागाकडून थकीत जीएसटी कर वसुलीसाठी कठोर पावले उचलण्यात येत आहेत. मागील आठवड्यात थकीत कर वसुलीसाठी कन्नड येथील एका व्यापाऱ्याची मालमत्ता जप्त केली होती. आता अशी धडक कारवाई राज्य वस्तू व सेवा कर विभागाकडून ता. गंगापूर, छत्रपती संभाजीनगर येथील एका व्यापाऱ्यावर करण्यात आली आहे. या व्यापाऱ्याकडे एक कोटी एक्क्यांशी लाख सहा हजार आठशे बत्तीस रुपये कर थकबाकी प्रलंबित होती. वारंवार नोटीस बजावूनही कराचा भरणा करण्यात आला नव्हता. त्यामुळे अखेर विभागाने साडेसहा एकर जमीन जप्तीची कारवाई केली. अपर राज्यकर आयुक्त अभिजीत राऊत, राज्यकर उपायुक्त चंद्रशेखर बोरडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक राज्यकर आयुक्त संजीव नागरगोजे, राज्यकर निरीक्षक अर्चना हामकडे, राज्यकर निरीक्षक कोमल ढवण, कर सहायक किशोर कवडे यांनी ही कारवाई केली. राज्य कर विभागाने करदात्यांना वेळेत कर भरण्याचे आवाहन केले आहे. अन्यथा थकीत जीएसटी कर वसुलीसाठी थकबाकीदाराविरुद्ध पुढील काळातही अशाच प्रकारची कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा दिला आहे.

**जाहीर प्रगटन**

**मा.श्री. व्ही.सी. जोशी, ९ वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ३४४/२०२६**
**ॲड. एस. आर. कुंभार यांच्यामार्फत**
**अनिल पि. श्रीधर टाक वि. निरंक**

ज्यापेक्षा सुंदराबाई भ्र. श्रीधर टाक या दिनांक २५.१२.२०२५ रोजी जी वन हॉस्पीटल, छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहेत आणि तसेच अर्जदार १. अनिल पि. श्रीधर टाक, वय ४० वर्षे, धंदा नौकरी, रा. अंबिकानगर, पालवन रोड, बीड, ता.जि. बीड, २. शुभांगी भ्र, राजेंद्र बेदरे, वय ४५ वर्षे, धंदा घरकाम, रा. अंमळनेर, ता. आष्टी, जि. बीड ३. सविता भ्र. गणेश जोजारे, वय ४३ वर्षे, धंदा घरकाम, रा. बुरुड गल्ली, हिरालाल चौक, बीड, ता.जि. बीड

अर्जदार क्रं. १ हा मयत नामे सुंदराबाई भ्र. श्रीधर टाक यांचा मुलगा असून अर्जदार क्रं. २ व ३ हया विवाहित मुली आहेत. मयताचे पती हे दि. २९.०५.२००९ रोजी मयत झालेले आहेत. मयताचे आई-वडील फार वर्षापूर्वी मयत झालेले आहेत. या अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत असे वरील अर्जदाराचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/अर्जदारांना सदरहू मयत सुंदराबाई भ्र. श्रीधर टाक यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख ०४/०४/२०२६ आहे.

आज दिनांक ०५ मार्च २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन
स्वाक्षरीत / -
**अधिक्षक,**
दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड

स्वाक्षरीत / -
**क. लिपीक**

# महसूल अभियानांतर्गत शासनाच्या सेवा घरपोच व वेळेत मिळाव्यात-तहसीलदार छाया पवार

जालना । प्रतिनिधी

राज्य शासनाच्या छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान अंतर्गत रोहनवाडी (ता. जालना) येथे समाधान शिबिर व जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला. ग्रामपंचायत रोहनवाडी तसेच जिल्हा परिषद शाळेला अधिकाऱ्यांनी भेट देत नागरिकांशी थेट संवाद साधला. हा कार्यक्रम जिल्हाधिकारी जालना, अप्पर जिल्हाधिकारी जालना, निवासी उपजिल्हाधिकारी जालना आणि उपविभागीय अधिकारी जालना यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला. शिबिरात महसूल विभागाशी संबंधित विविध सेवाउतारा, नोंद दुरुस्ती, वारसा नोंद, फेरफार, जमीन अभिलेख



आदींबाबत मार्गदर्शन व अर्ज स्वीकृती करण्यात आली.

यावेळी तहसीलदार छाया पवार यांनी नागरिकांना अभियानाची सविस्तर माहिती देत शासनाच्या सेवा घरपोच व वेळेत मिळाव्यात, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे सांगितले. तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांनीही नागरिकांच्या शंकांचे निरसन केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या लोकाभिमुख व न्यायप्रिय प्रशासनाच्या आदर्शातून प्रेरणा घेऊन महसूल विभाग नागरिकांच्या दारी सेवा पोहोचवत आहे. आजचा हा समाधान शिबिर उपक्रम म्हणजे केवळ कागदपत्रांची पूर्तता नव्हे, तर लोकांच्या विश्वासाला बळकटी देण्याचा प्रयत्न आहे. जमीन नोंदीतील त्रुटी, वारसा नोंदणी, फेरफार प्रकरणे किंवा इतर महसूलविषयक अडचणीया सर्व बाबींसाठी नागरिकांनी कार्यालयीन फेऱ्या मारण्याऐवजी अशा शिबिरांचा लाभ घ्यावा. शासनाच्या प्रत्येक योजनेचा लाभ पात्र व्यक्तींपर्यंत पोहोचवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. रोहनवाडीतील ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला आहे. पारदर्शकता, तत्परता आणि विश्वास या तीन तत्वांवर महसूल विभाग कार्यरत राहील, याची मी खात्री देते. नागरिकांच्या अर्जांची तत्काळ स्वीकृती व प्राथमिक तपासणी, महसूल सेवांबाबत मार्गदर्शन पुस्तिकांचे वितरण, जिल्हा परिषद शाळेला भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद, ग्रामपंचायत स्तरावर तक्रार निवारणावर भर आदी या कार्यक्रमाचे वैशिष्ट्ये होते. कार्यक्रमास ग्रामस्थ, महिला बचत गट सदस्य, युवक व स्थानिक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिबिरामुळे महसूल कामकाजाबाबत जनजागृती होऊन नागरिकांमध्ये समाधानाची भावना निर्माण झाल्याचे दिसून आले.


# भूम तालुक्यात बिबट्याची दहशत वाढली

## वनविभागाचा सतर्कतेचा इशारा, शेतकऱ्यांना काळजी घेण्याच

धाराशिव। प्रतिनिधी

भूम तालुक्यात बिबट्याच्या हल्ल्यांचे सत्र सुरूच असल्याचे समोर आले आहे. रामेश्वर शिवारात बिबट्यासदृश प्राण्याने शेळीला पकडल्याची माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिल्यानंतर आता वारेवडगाव येथे गाईवर हल्ला झाल्याची गंभीर घटना घडली होती. ही घटना शेतकरी बाळासाहेब नलवडे यांच्या शेतात घडली असून हल्ल्यात गाईचा मृत्यू झाला होता. त्यानंतर वनविभाग व शेतकऱ्याच्यावतीने लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात बिबट्या कैद झाल्याची माहिती समोर आली आहे. बाळासाहेब नलवडे यांच्या गाईला लक्ष्य करताना बिबट्या कॅमेऱ्यात दिसून आला आहे.

घटनेची माहिती मिळताच वन विभागाला तत्काळ कळविण्यात आले. वन अधिकारी कुटे, वनपाल जाधवर व जगताप देशमुख आदी कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. बिबट्याचा मागोवा घेण्यासाठी वनविभागाची टीम कार्यरत झाली असून परिसरात गस्त वाढविण्यात आली आहे. या सलग घटनांमुळे भूम तालुक्यासह आसपासच्या गावांतील शेतकरी व नागरिकांमध्ये भीतीचे



वातावरण निर्माण झाले आहे. बिबट्याचा तात्काळ बंदोबस्त करावा, अशी मागणी शेतकरी व ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. दरम्यान, वनविभागाकडून तालुक्यातील नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. रात्रीच्या वेळी शेतात किंवा घराबाहेर एकटे जाऊ नये, जनावरे सुरक्षित व बंदिस्त ठिकाणी बांधावीत, लहान मुलांवर लक्ष ठेवावे तसेच संशयास्पद हालचाल दिसल्यास त्वरित वनविभागाशी संपर्क साधावा, असा संदेश देण्यात आला आहे. ''सतर्क रहा, सुरक्षित रहा,'' असे आवाहन वनविभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

# सेलू शहरात मातीस्नानाने रंगले धूलिवंदन

परभणी। प्रतिनिधी

धूलिवंदन सण म्हणजे रंगांची उधळण, मात्र सेलूमध्ये दोन दशके हा सण रंगांऐवजी मातीच्या सान्निध्यात, आरोग्यदायी पध्दतीने साजरा करण्याची परंपरा जपली जात आहे. गांधी प्राकृतिक चिकित्सा एवं योग मंडळ व श्रीरामजी भांगडिया रुग्णसेवा मंडळाच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी पारंपरिक मातीस्नानाचा उपक्रम उत्साहात पार पडला. यंदा या अभिनव उपक्रमाचे २० वे वर्ष पूर्ण झाले.

प्रारंभी हा उपक्रम चंद्रप्रकाश सांगतानी व गंगाधर शेरे पाटील यांच्या शेतात सुरू झाला होता. मागील तीन वर्षांपासून मंठा रोडवरील मालाणी यांच्या शेतातील 'हॉटेल परिवार फार्म अँड ग्रो टुरिझम' परिसरात संयोजक शिवनारायण मालाणी यांच्या मार्गदर्शनाखाली मातीस्नानाचे आयोजन केले जाते. ग्रामीण, निसर्गरम्य वातावरणात होणारा हा सोहळा नागरिकांसाठी वेगळाच अनुभव ठरतो. यावेळी सहभागी नागरिकांनी तीळ तेलाने



अंगाला मालिश करून पारंपरिक पध्दतीने मातीचा लेप लावला. सुमारे तासभर उन्हात बसून माती सुकवण्यात आली. त्यानंतर सचैलस्नान करून शरीरशुध्दीचा अनुभव घेतला. मातीस्नानानंतर कडधान्यमिश्रित उसळ व आयुर्वेदिक काढ्याचे वाटप करण्यात आले. नैसर्गिक उपचारपध्दती, साधेपणा आणि आरोग्यस्नेही आहार यांचा संगम या उपक्रमात अनुभवायला मिळाला.

शिवनारायण मालाणी, हितेश शहा, रेवा कुंदनानी, प्रवीण माणकेश्वर, आनंद बाहेती, वल्लभ राठी, सतीश जाधव, रोहित काला, भास्करराव घोडके, कैलासराव काळे, श्रीपाद रोडगे, डॉ.विलास मोरे, गंगाधर कान्हेकर, सुनील गायकवाड, बाबासाहेब हेलसकर, कृष्णा काटे, वाल्मिक घाडगे (परतूर), डिगांबर डोंबे, राम सुरवसे, रामकिशन कटारे, सुभाष मोहकरे, प्रेमगोपाल कासट (मंठा) आदींसह अनेकांनी सहभाग घेतला. आरोही ढवळे, स्वराज जाधव, राघव व श्लोक काटे या चिमुकल्यांनीही मातीस्नानाचा आनंद लुटत सणाला वेगळीच रंगत आणली. यानिमित्त आयोजित गीत-संगीत कार्यक्रमाने वातावरण भारावून गेले. कृष्णा काटे, डॉ.विलास मोरे, गंगाधर कान्हेकर व वाल्मिक घाडगे यांनी सादर केलेल्या सुरेल गीतांना उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली. गणेश सिंग, विष्णू, करण सिंग, यश आचलिया आदी उपस्थित होते.

# मनपा करातील २ टक्के निधी स्मार्ट सिटीच्या खात्यात

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

महापालिकेला स्मार्ट सिटी कंपनीकडून देण्यात येणाऱ्या तांत्रिक सहाय्य, ई-गव्हर्नन्स प्रणालींचे संचालन आणि देखभालीच्या खर्चासाठी कायमस्वरूपी आर्थिक तरतूद करण्याची मागणी करण्यात आली होती. हा निर्णय प्रशासनाने मान्य केला. त्यावरून मनपातील प्रशासकराज संपण्याच्या अवघ्या सहा दिवसांपूर्वी आयुक्त जी. श्रीकांत यांनी कर वसुलीच्या उत्पन्नातील २ टक्के निधी स्मार्ट सिटीच्या झोळीत टाकण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला.

३ फेबुवारी रोजी त्यांनी यासंदर्भातील ठरावावर स्वाक्षरीही केली. त्यांच्या या निर्णयामुळे पुन्हा एकदा प्रशासक काळात केलेली उधळपट्टी समोर आली आहे. यात प्रामुख्शाने अनाअवश्यक ॲपवर




झालेल्या खर्चाचा समावेश असल्याची चर्चा आहे. त्याचबरोबर स्मार्ट सिटीकडून ४ कोटी रुपयांच्या निधीची स्वतंत्र मागणीही मनपाकडे करण्यात आली आहे. स्मार्ट सिटी कंपनीने महापालिकेसाठी कर वसुली आणि नागरी सेवांसाठी विविध डिजिटल प्रणाली विकसित केल्या आहेत. ई-गव्हर्नन्स अंतर्गत ३९ मॉड्युल्स, व्हॉट्?सॲप चॅटबॉट, बीपीएमएस, पेमेंट गेटवे तसेच स्मार्ट नागरिक मोबाइल ॲप यांचा त्यात समावेश आहे. या प्रणालींमुळे नागरिकांना कर भरणा प्रक्रिया सुलभ झाली असून कामकाजात पारदर्शकता वाढल्याचा दावा प्रशासनाकडून करण्यात आला आहे. मात्र या सर्व यंत्रणांचे नियमित संचालन, तांत्रिक देखभाल आणि अद्ययावत सुधारणा यासाठी सातत्याने निधी आवश्यक असल्याचे स्मार्ट सिटीने मनपाला दिलेल्या पत्रात नमूद केले आहे. महापालिका आयुक्त जी. श्रीकांत यांनी ३ फेबुवारी रोजी म्हणजेच महापालिकेतील प्रशासकराज संपण्याच्या अवघ्या ६ दिवसांपूर्वी या ठरावावर स्वाक्षरी करून त्याला मंजूरी दिली आहे. या निर्णयावर आयुक्त जी. श्रीकांत यांच्यासह नगरसचिव नंदकिशोर भोंबे, उपायुक्त विकास नवाळे, प्रसाद देशपांडे आदी अधिकाऱ्यांच्या डिजिटल स्वाक्षऱ्या आहेत. प्रशासनाच्या या निर्णयामुळे मनपा आणि स्मार्ट सिटी यांच्यातील आर्थिक समन्वयाला औपचारिक स्वरूप मिळाले आहे.

४ कोटींची स्वतंत्र मागणी

स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी जी. श्रीकांत यांच्या स्वाक्षरीने मनपाकडे ४ कोटी रुपयांच्या निधीची मागणीही करण्यात आली आहे. सध्या उपलब्ध मनुष्यबळ, तांत्रिक सेवा आणि भविष्यातील सॉफ्टवेअर विकासाचा खर्च लक्षात घेता ही रक्कम आवश्यक असल्याचे पत्रात स्पष्ट करण्यात आले आहे. कर वसुली उत्पन्नातील २ टक्के हिस्सा देण्याचा ठराव मंजूर झाल्याने कंपनीला आर्थिक स्थैर्य मिळणार असल्याचे मानले जात आहे.

दैनिक
राज्य लोकतंत्र


# मोटरसायकल चोरणारे तीन आरोपी पोलिसांच्या ताब्यात

## गेवराई पोलिसांनी केला २५ लाखाचा मुद्देमाल जप्त

बीड । प्रतिनिधी

**गेवराई पोलीसांनी मोटार सायकल चोरणाऱ्या तीन आरोपीतांना ताब्यात घेऊन १७ मोटार सायकल, १६ सांगाडे व ३० इंजन असे एकूण ५० पेक्षा जास्त मोटार सायकल व मोटार सायकलचे पार्ट सह अंञदाजे एकूण २५,००,०००/-रू चा मुद्देमाल जप्त केला.**

पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी बीड जिलह्यातील मालाविरूध्द होणाऱ्या चोरीच्या गुन्ह्यातील आरोपीतांचा शोध घेऊन गुन्हे उघडकीस आणण्याच्या दिलेल्या सुचनेनुसार नवनीत काँवत, पोलीस अधीक्षक, बीड,.सचिन पांडकर, अपर पोलीस अधीक्षक, बीडअनिल कटके, उप विभागीय पोलीस अधिकारी गेवराई यांच्या मार्गदर्शनाखाली किशोर पवार, पोनि. पोलीस ठाणे गेवराई यांनी डीबी पथकाचे मार्फतीने अचुक नियोजन करून गेवराई पोलीस ठाणे हद्दीतील मालाविरूध्द होणाऱ्या चोरीच्या गुन्ह्यातील आरोपीतांचा शोध घेण्यासाठी मागील दोन महिण्यापासून घडलेल्या वाहन चोरीच्या गुन्हे संबंधाने गेवराई शहरातील व परिसरातील सर्व फुटेजची पाहणी करून संशयीत आरोपी निष्पन्न त्यांचेवर पाळत ठेवून आज दिनांक ०५.०३.२०२६ रोजी ०३ संशयीत आरोपीतांना ताब्यात घेऊन त्यांचेकडून १७ मोटार सायकल, १६ मोटार सायकल सांगाडे (चेसीस) व ३० मोटार सायकल इंजन व मोटारसायकलचे विविध कंपनीचे इतर साहित्य असे अंदाजे एकूण २५,००,०००/-रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



सदर संशयीत आरोपी मध्ये १) सय्यद अब्रार सय्यद जैनुद्दीन वय ३१ वर्ष व्यवसाय. गॅरेज रा. छत्रपती संभाजीनगर एम.आय.डी. शहा शौकत कॉलनी रेल्वे स्टेशन छत्रपती संभाजीनगर. २) सय्यद इमदाद हुसैन अरशद हुसैन, वय २२ वर्ष व्यवसाय प्लंबिंग रा. मासूम कॉलनी मोमीनपुरा रोड बीड ३) शेख आसेम शेख मझर वय ३२ वर्ष व्यवसाय भंगारवाला राहणार टिपू सुलतान चौक माऊली मंगल कार्यालय शेजारी नेकनूर जिल्हा बीड यांना अटक करण्यात आली असून एक आरोपी अद्याप फरार आहे. सदर प्रकरणात मोटार सायकलचे चेसीस व इंजीन नंबर बदलण्यात आले असून चेसीस व इंजीन नंबर घेऊन पुढील तपास चालू असून आरोपीतांकडून आणखी काही मोटार सायकल मिळण्याची शक्यता आहे. जप्त करण्यात आलेल्या मोटार सायकल, सांगाडे व इंजीन हे बीड, छत्रपती संभाजीनगर, परभणी व हिंगोली जिल्ह्यातील चोरी गेलेल्या मोटार सायकलचे असण्याची शक्यता असून सदर जिल्ह्यातील गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे. सदर आरोपी हे मोटार सायकल चोरी केल्यानंतर आरोपी शेख आसेम शेख मझर, रा. नेकनूर याच्याकडे घेऊन जात व असीम शेख हा अवघ्या दोन तासात मोटार सायकलचे सर्व पार्ट वेगवेळे करून मोटार सायकलची विल्हेवाट लावत होता.

सदर कारवाई नवतीत काँवत, पोलीस अधीक्षक, सचिन पांडकर, अपर पोलीस अधीक्षक बीड, अनिल कटके, उप विभागीय पोलीस अधीकारी उप विभाग गेवराई यांच्या मार्गदर्शनाखाली किशोर पवार, पोलीस निरीक्षक गेवराई, सपोनि.दिपक लंके, सपोनि. संतोष जंजाळ, पोउपनि. प्रदीप आढाव, मपोउपनि. निर्शीगधा खुळे, ग्रेपोउपनि. सुरेश पारधी, ग्रेपोउपनि. श्रीमंत उबाळे, पोह/१३२७ रविंद्र राऊत, पोह/९५४ आशोक हंबर्डे, पोह/२२३ कल्याण राठोड, पोह/५३० घोलप, चापोह/राजु सांगळे, पोकॉ/२१०४ ऋषी पोटे व होमगार्ड/महादेव पाटोळे यांनी सहभाग घेतला.

# आखाती युद्धाचा फटका; कांदा, द्राक्षे-बेदाणा व्यापारावर परिणाम, सुरेश धस यांची सभागृहात आक्रमक मागणी

आष्टी । प्रतिनिधी

सुरेश धस यांनी महाराष्ट्र विधिमंडळ यांच्या अर्थसंकल् पीय अधिवेशन २०२६ दरम्यान आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील कृषी निर्यातीवर होत असलेल्या गंभीर परिणामांचा मुद्दा लक्षवेधी सूचनेद्वारे सभागृहात उपस्थित केला. कांदा, द्राक्षे आणि बेदाणा या प्रमुख पिकांच्या निर्यात व्यापारावर मोठा परिणाम होत असून शेतकरी व व्यापाऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे त्यांनी नमूद केले.

धस यांनी सांगितले की, आखाती देश हे महाराष्ट्रातील कृषी उत्पादनांचे प्रमुख निर्यात बाजारपेठ असून सध्याच्या परिस्थितीमुळे मालाची निर्यात रखडली आहे. परिणामी बाजारभाव घसरत असून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. या



पार्श्वभूमीवर राज्य सरकारने तातडीने निर्णय घेऊन शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा द्यावा, अशी जोरदार मागणी त्यांनी केली.

सध्या अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असल्याने तत्काळ बैठक घेणे शक्य नसले तरी अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर संबंधित मंत्र्यांनी तातडीने बैठक बोलावून ठोस निर्णय घ्यावा, अशी विनंतीही त्यांनी सभागृहात केली. यावर संबंधित मंत्र्यांनी सकारात्मक भूमिका घेत लवकरच बैठक घेण्याचे आश्वासन दिले.

दरम्यान, चीनमार्गे अफगाणिस्तान येथून मोठ्या प्रमाणावर बोगस बेदाणा राज्यात दाखल होत असल्याचा गंभीर मुद्दाही धस यांनी उपस्थित केला. पिंपळगाव बसवंत येथील प्रमुख बाजार समिती तसेच तासगाव परिसरात अशा प्रकारचा माल आल्याचे त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. या प्रकरणातील जबाबदारांवर गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करावी, अशी ठाम मागणी त्यांनी केली. या प्रश्नांमुळे राज्यातील कृषी व व्यापार क्षेत्रातील चिंता वाढली असून सरकारच्या पुढील निर्णयाकडे शेतकरी व व्यापाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# पवनचक्कीवर दरोडा टाकणाऱ्या अट्टल टोळीस ठोकल्या बेड्या; स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेची कामगिरी

बीड । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील येवलवाडी शिवारात पवनचक्की चे काम चालू असताना या ठिकाणच्या वाचमनला मारहाण करून या ठिकाणचे केबल आणि इतर साहित्य चोरून नेणाऱ्या टोळीला गुन्हे अन्वेषण शाखेच्या पोलिसांनी जेरबंद केले.

पोलीस ठाणे पाटोदा हद्दीतील येवलवाडी ता. पाटोदा जि. बीड गावचे शिवारात रिनिव्ह पॉवर कंपनीने उभा केलेल्या पवनचक्कीला वाँचमन म्हणुन काम करणा-या सौरभ बाबुराव येवले वय २२ वर्षे रा. येवलवाडी ता. पाटोदा जि.बीड यांना व त्याचे साथीदार शुभम बबन सोंडगे रा. पारनेर ता. पाटोदा जि.बीड यांना दि.२५.०२.२०२६ रोजी रात्री ११.३० वाचे सुमारास



अज्ञात चोरट्याने मारहाण करून पवनचक्कीमधील केबल व साहित्य चोरून नेले होते. त्यावरून पोलीस ठाणे पाटोदा येथे अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा क्रमाक ५४/२०२६ कलम ३०९(४), १२७(२),३२४(४) भारतीय न्याय संहिता प्रमाणे दाखल झालेला आहे.

सदर गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखा बीड व पोस्टे पाटोदा हे करत असतांना स्थानिक गुन्हे शाखेतील पोउपनि श्रीराम खटावकर, सुशांत सुतळे, पोह/सोमनाथ गायकवाड, पोह/मारूती कांबळे, पोह/राहुल शिंदे, पोह/बाळु सानप, पोह/आनंद मस्के, पोअ/अर्जुन यादव, पोअ/अशपाक सय्यद, पोअ/मनोज परजणे, पोअ/विकी सुरवसे, चापोह/वडमारे, चापोअ/हराळे, चापोअ/मांजरे यांना गुप्त बातमीदारा मार्फत व तांत्रिक विश्लेषनाव्दारे माहिती मिळाली की, सदरचा गुन्हा हा मधुकर आबा काळे रा. खामकरवाडी ता.वाशी जि.धाराशिव व बबलु जालींधर शिंदे रा.दसमेगाव ता. वाशी जि.धाराशिव यांनी व त्यांचे इतर साथीदाराने केला असुन ते दोघे सध्या खामकरवाडी शिवारातील एका फटाक्याच्या कारखान्यावर काम करत आहेत. अशी खात्रीशिर बातमी मिळाल्याने वरील नमुद अधिकारी व अंमलदार यांनी नमुद ठिकाणी छापा मारून नमुद दोन आरोपीस ताब्यात घेवुन त्यांच्याकडे विचारपुस केली असता त्यांनी सदरचा गुन्हा त्यांचे

# बीड येथे होणार स्व. खाशाबा जाधव चषक राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा

आष्टी । प्रतिनिधी

ऑलिम्पिक पदक विजेते, भारताच्या क्रीडा इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद झालेल्या स्व.खाशाबा जाधव चषक राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा-२०२६ बीड येथे आयोजित करण्याच्या माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या मागणीला यश आले. उपमुख्यमंत्री ना. सुनेत्राताई पवार यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबई येथे झालेल्या बैठकीत विविध राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांचे आयोजनाबाबत निर्णय झाला.

महाराष्ट्र कुस्तीगीर संघाचे बीड जिल्हा अध्यक्ष माजी आ. भीमराव



धोंडे यांनी ही मागणी केली होती. या मागणीची दखल घेत ना. सुनेत्राताई पवार यांनी मागणी मान्य केल्याने जिल्ह्यातील कुस्ती प्रेमींना पर्वणी मिळणार आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, स्व. खाशाबा जाधव चषक राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा - २०२६ चे आयोजन बीड येथे करण्यास उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांनी मान्यता दिलेली आहे.

क्रिडा क्षेत्राविषयी अत्यंत आवड असलेले कुस्तीपटू व राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी भीमराव धोंडे यांनी राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा बीड येथे घेण्याची मागणी मान्य झाल्याने जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्रासाठी एक ऐतिहासिक संधी निर्माण झाली आहे.या राज्यस्तरीय स्पर्धेमुळे जिल्ह्यातील समृद्ध कुस्ती परंपरेला नवे बळ मिळणार

# राज्यस्तरीय अधिवेशनास प्रमाणित लेखापरीक्षकांनी उपस्थित रहावे -बोरखेडे

बीड । प्रतिनिधी

ऑडिटर कौन्सिल अँड वेल्फेअर असोसिएशन महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने पुणे जिल्ह्यांतील अध्यत्मिक क्षेत्र असलेल्या आळंदी येथे राज्यस्तरीय अधिवेशन दिनांक २१ व २२ मार्च २०२६

रोजी आयोजित केले आहे, या अधिवेशनास राज्यातील

राज्यातुन प्रमाणित लेखापरीक्षक यांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा सचिव एस. एस.बोरखेडे यांनी केले आहे. या राज्यस्तरीय अधिवेशनास सहकार खात्यातील सहकार मंत्री,सहकार आयुक्त व निबंधक, महाराष्ट्र राज्य,अप्पर निबंधक, लेखापरीक्षण महाराष्ट्र राज्य



तसेच सहकार खात्यातील सर्व वरिष्ठ अधिकारी यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. त्यामुळे या अधिवेशनास सर्वांनी उपस्थित राहण्याचे अहवान ऑडिटर कौन्सिल अँड वेल्फेअर असोसिएशनचे बीड जिल्हा सचिव एस एस बोरखेडे यांनी केले आहे.

# बदामराव पंडितांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हास्तरीय गौराई कला महोत्सवाचे आयोजन

गेवराई । प्रतिनिधी

माजी राज्यमंत्री, भाजपा नेते बदामराव पंडित यांचा वाढदिवस ३ मे २०२६ रोजी असून, त्यांच्या वाढदिवसानिमित्त गेवराईत, स्वरसिद्धी फाउंडेशन धोंडराईच्या वतीने जिल्हास्तरीय गौराई कला महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात सहभागी होण्यासाठी १५ मार्च २०२६ पर्यंत नाव नोंदणी करण्याचे आवाहन संस्थेचे विश्वस्त सचिव रामदास कोकाटे आणि अध्यक्ष सिद्धेश्वरी कोकाटे यांनी केले आहे.



स्वरसिद्धी फाउंडेशन धोंडराई यांच्या वतीने गेल्या पाच वर्षापासून माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित केला जाणारा गौराई कला महोत्सव यावर्षी दिनांक २०, २१ आणि २२ मार्च २०२६ रोजी होणार आहे. गेवराई नगर परिषदेच्या छत्रपती शिवाजी महाराज सांस्कृतिक व शॉपिंग सेंटर येथे होणाऱ्या या महोत्सवात विविध स्पर्धांची व शास्त्रीय गायनाची मेजवानी गेवराईकरांना मिळणार आहे. या स्पर्धांमध्ये शालेय स्तर आणि वैयक्तिक स्तरावर विविध गटांमध्ये चित्रकला, निबंध, समूहगीत गायन, शास्त्रीय गीत गायन आणि समूह नृत्य आदी स्पर्धांचे नियोजन करण्यात आले आहे. स्पर्धेतील यशस्वी कलावंतांसाठी सन्मानचिन्ह प्रमाणपत्र व आकर्षक बक्षीसही ठेवण्यात आलेले आहेत.

गौराई कला महोत्सवाचा मुख्य उद्देश ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना हक्काचे व्यासपीठ मिळावं हा असून, या महोत्सवात व स्पर्धेत सहभागी होण्यासाठी सिद्धेश्वरी रामदास कोकाटे अध्यक्ष स्वरसिद्धी फाउंडेशन धोंडराई मोबाईल क्रमांक- ७४९८७२८३१३ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन फाउंडेशनच्या वतीने संस्थेचे सचिव रामदास कोकाटे यांनी केले आहे.

# राजाभाऊ फडचे डोके ठिकाणावर आहे का? धनंजय मुंडे समर्थकांची परळीत पत्रकार परिषद

## राजाभाऊ फड विरोधात अब्रुनुकसानीचा फौजदारी दावा ठोकणार

परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी

स्व. महादेव मुंडे यांच्या हत्या प्रकरणात बीड जिल्ह्याबाहेरील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्फत चौकशी सुरू असून, काही जणांच्या ब्रेन मॅपिंग व नार्को टेस्ट केल्या जात असल्याचे पोलिस प्रशासनाने स्पष्ट केले होते. हे अहवाल अत्यंत गोपनीय ठेवले जातात, असा तपास प्रक्रियेचा प्रघात आहे. मात्र या अहवालांमधून ''माझ्याकडे काहीतरी कानात सांगितलेली माहिती आहे'', असा दावा करून शरद पवार गटाचे राजाभाऊ फड यांनी थेट आ. धनंजय मुंडे साहेबांचे नाव घेणे हे संतापजनक असून याचा उद्देश धनंजय मुंडे साहेबांची बदनामी करण्यापुरता मर्यादित नसून गृह विभागाच्या तपासातील कार्य पद्धतीवर संशय निर्माण करणारे असल्याचे मत धनंजय मुंडे यांच्या सहकाऱ्यांनी एका संयुक्त पत्रकार परिषदेत व्यक्त केले आहे.

आज सकाळी शरद पवार गटाचे राजाभाऊ फड यांनी एक पत्रकार परिषद घेऊन तोंडाला येतील ते आरोप करत स्व. महादेव मुंडे यांच्या हत्याप्रकरणी थेट धनंजय मुंडे यांचे नाव घेऊन सनसनाटी निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर परळी शहरातील जगमित्र कार्यालयात धनंजय मुंडे यांच्या सहकाऱ्यांनी एक संयुक पत्रकार परिषद घेत राजाभाऊ फड यांच्या खोट्या आरोपांचा बुरखा फाडला. स्व. महादेव मुंडे यांची हत्या ही एक दुर्दैवी घटना होती. त्यात संबंधित कुटुंबियांनी मागणी केलेल्या अधिकाऱ्यांच्या मार्फत चौकशी सुरू आहे. काही संशयितांच्या ब्रेन मॅपिंग व नार्को टेस्ट केल्याचे प्रसार माध्यमांच्या माध्यमातून समोर आले. मात्र संबंधित टेस्टचे अहवाल हे गोपनीय ठेवले जातात व ठराविक वेळी ते न्यायालयात सादर केले जातात.


# बीडमध्ये नऊ दिवस चतुर्भुजपट्टाभिमरामोत्सोव

## श्री श्री शंकर भारती महास्वामीजी सानिध्यात पावन पर्वाचा लाभ

बीड । प्रतिनिधी

अज्ञानाचा व पापाचा नाश करणारे पराभवनामक सवंसर घेऊन हे नववर्ष गुढीपाडवा पासून सुरू होत आहे. या पावन पर्वात योगानंदेश्वर सरस्वती मठ, कृष्णराज नगर म्हैसूर ,कर्नाटक येथील महास्वामीजी शंकर भारतीजी यांची 'विजय यात्रा' भारतभर सुरू असून १८ ते २९ मार्च दरम्यान बीडमध्ये पावन पर्वाचा लाभ होणार आहे.

चतुर्भुजपट्टाभिरामाचे दर्शन या निमित्ताने रामोत्सव कालावधीत बीडकरांना होत आहे. या सुवर्णकालावधीचा मोठ्या संख्येने



लाभ घेता यावा यासाठी नुकतीच एक व्यापक बैठक दत्त मंदिर येथे संपन्न होऊन कार्यक्रमाची रूपरेषा ठरवण्यात आली आहे .बीडकरावर नेहमीच भगवंताची आणि संतकृपा होत असते ,येथे सातत्याने धार्मिक कार्यक्रमाची रेलचेल असतेच त्याच महाभाग्याच्या गोष्टीतून भाग्य अधिक उज्वल करण्यासाठी प्रभू श्रीरामाचे दर्शन आणि त्यानिमित्ताने कथा ,प्रवचन, रामोत्सव कल्पोक्त पूजा, सामुदायिक रामरक्षा पठण, चतुर्वेद पारायण, पाद्यपूजन असे भरगच्च विशेष कार्यक्रम आणि आशीर्वाचन सभा या रामोत्सव कालावधीत होणार आहेत. महास्वामीजींची भव्य स्वागत यात्रा बलभीम चौकापासून करण्याचे नियोजन आणि नऊ दिवस हा रामोत्सव रविराज मंगल कार्यालय येथे मोठ्या थाटात संपन्न करण्याचेही नियोजन झाले आहे.

ज्या, ज्या ठिकाणी आद्य शंकराचार्यांचे भ्रमण कालावधीत वास्तव्य राहिलेले आहे ,त्या, त्या स्थळी महास्वामीजी शंकरभारतीजी यांची ही विजय यात्रा जात आहे, त्याचाच एक भाग म्हणून बीडकरांना हे रामोत्सव सोहळ्याचे पावन पर्व प्राप्त झाले आहे.

यानिमित्ताने संपन्न झालेल्या नियोजन बैठकीत समन्वयक ह भ प भार्गव महाराज जोशी यांनी या विजयात्रेबाबत सविस्तर माहिती दिली. श्री विनायक महाराज पाटंगणकर,

# केज नगरपंचायतीत ३.६७ कोटींचा घरकुल घोटाळा

## आ. नमिता मुंदडांनी विधानसभेत सरकारला धारेवर धरले!

बीड । प्रतिनिधी

गरीब आणि गरजूंच्या हक्काच्या घरांसाठी आलेल्या निधीवर डल्ला मारणाऱ्या केज नगरपंचायतीमधील ३.६७ कोटी रुपयांच्या भ्रष्टाचार प्रकरणाने आज राज्याचे विधिमंडळ गाजले. आमदार नमिता मुंदडा यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे हा गंभीर मुद्दा उपस्थित करत प्रशासकीय अनागोंदी चव्हाट्यावर आणली. यावर सरकारने कठोर भूमिका घेत, दोषींवर तातडीने फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे व संबंधित कर्मचाऱ्यांना निलंबित




करण्याचे आदेश दिले आहेत.

पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत २०२१-२२ या कालावधीत केज नगरपंचायतीला प्राप्त झालेला ३ कोटी ६७ लाख रुपयांचा निधी लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करणे अपेक्षित होते. मात्र, नगरपंचायतीच्या काही अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी संगनमत करून हा निधी नियमबाह्यपणे कंत्राटदारांच्या , विविध ट्रेडर्स ,फॅब्रिकेटर्स आणि इलेक्ट्रिकल्स अशांना १५८ धनादेशाद्वारे खात्यावर वर्ग केला.

काही कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक खात्यात जमा केला.घरकुल अनुदान इतर कामासाठी वापरणे हाच मुळात फौजदारी गुन्हा आहे. ज्यांच्या नावे धनादेश काढले गेले त्यांचे वर्क ऑर्डर (कार्यारंभ आदेश) किंवा देयके कुठे आहेत, त्याचे कोणतेही रेकॉर्ड केज नगरपंचायत कडे उपलब्ध नाही. निधी महाराष्ट्र ग्रामीण बँकेत ठेवून त्याचा अपहार केला. लेखापरीक्षणात हा सर्व गैरप्रकार उघड झाला असून, गरिबांच्या हक्काच्या पैशांची लूट झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

आमदार नमिता मुंदडा यांनी सभागृहात या घोटाळ्याचा पाढा वाचला. त्यावर उत्तर देताना राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी सरकारची बाजू मांडली. त्यांनी स्पष्ट केले की,

◀◀ पान ३ वर

# शिक्षकांचे अनुपस्थिती : शिक्षणाधिकारी डॉ. कुंवर यांनी वाजवली शाळेची घंटी

## मुख्याध्यापकासह ६ शिक्षकावर कारवाई

बीड । प्रतिनिधी

**बीड जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी डॉ. किरण कुंवर यांनी अल्पावधीतच कार्यालयातील कर्मचारी, अधिकारी आणि जिल्ह्यातील शिक्षकांना शिस्त लावण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. बारावी दहावीच्या परीक्षेतील त्यांनी केलेल्या उपाय योजनेमुळे त्या चर्चा आल्या आहे. गुरुवारी अचानक प्रार्थनेच्या वेळात शाळा भेट केली. यावेळी चक्क शिक्षणाधिकारी डॉ. किरण कुंवर यांनी शाळेची घंटा वाजून शाळा भरविली.**

गुरुवार दि.५ मार्च रोजी सकाळी ८.३० वाजता बीड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी डॉ. किरण किरण कुंवर यांनी गेवराई तालुक्यातील रांजणी शाळेला अचानक भेट दिली. मार्च महिन्यात शाळा भरवण्याची वेळ ८.३० आहे. शिक्षकांनी वेळेत शाळेत उपस्थित असणे अपेक्षित आहे. मात्र जिल्हा परिषदेच्या रांजणी शाळेवर ९.०० वाजले तरी कोणीही शिक्षक उपस्थित नव्हता. त्यामुळे शिक्षणाधिकारी यांनी स्वतः घंटी वाजवून शाळा भरविली.

मुख्याध्यापकासह ६ शिक्षकावर कारवाई

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रांजणी शाळेचे मुख्याध्यापक अनिल गोल्हार, सहशिक्षक प्रल्हाद खेत्रे, अजय पतंगे, श्रीमती मस्के सपना, श्रीमती छाया खांडे, पुरी अर्चना, यांना तात्काळ कारणे दाखवा नोटिसा देण्यात आल्या आहेत.या भेटीमुळे जिल्हा परिषदेच्या शिक्षकात खळबळ उडाली आहे.

परवेक्षीय अधिकाऱ्यांची डोळेझाक

जिल्ह्यात अनेक ठिकाणी अशीच वितरक परिस्थिती आहे. काही ठिकाणी शिक्षक वेळेवर उपस्थित राहत नाहीत. अनेक शिक्षक गैरहजर असतात. शिक्षण विस्तार अधिकारी आणि केंद्रप्रमुख अशा प्रकाराकडे डोळेझाक करताना दिसून येते.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
शुक्रवार दि.०६ मार्च २०२६ | पान ७

# घरफोडी करणारा 'गँगस्टर' जेरबंद; ६२ लाखांचे सोने-चांदीचे दागिने जप्त

पुणे । प्रतिनिधी

पुणे शहरात घरफोडी करून दहशत निर्माण करणाऱ्या आणि उत्तर प्रदेशात गंभीर गुन्ह्यांमध्ये वॉन्टेड असलेल्या आरोपीला विश्रामबाग पोलिसांनी अटक करत मोठी कारवाई केली आहे. या आरोपींकडून सुमारे ६२ लाख रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने, लॅपटॉप आणि दोन मोबाईल जप्त करण्यात आले आहेत. हे दोन्ही गुन्हेगार आंतरराज्यीय 'सनी' गँगचे सदस्य आहेत. त्यांच्यावर खून, खूनाचा प्रयत्न आणि खंडणीचे अनेक गुन्हे उत्तर प्रदेशात दाखल आहेत.

आरोपी परराज्यात घरफोडी करायला जाताना विमान किंवा रेल्वेचा प्रवासासाठी वापर करत. आकाश सुभाष ( २३ मूळ रहिवासी मेरठ, उत्तर प्रदेश सध्या सुंदरनगरी, दिल्ली) आणि जितेंद्र चतुर्वेदी ( ३२ सुंदरनगरी, दिल्ली) अशी अटक आरोपींची नावे आहे. विश्रामबाग पोलीस ठाण्यात जानेवारी महिण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. फिर्यादी घरात नसताना अज्ञात आरोपींनी दरवाजा तोडून घरफोडी केली होती. या गुन्ह्याचा तपास करण्यासाठी वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रदीप




कसबे यांनी तपास पथकाचे प्रभारी सहायक पोलीस निरीक्षक राजेश उसगावकर यांना आदेश दिले. त्यानुसार तपास पथकाने घटनास्थळ आणि परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासून संशयितांचा मागोवा घेण्यास सुरुवात केली.

पोलीस अंमलदार आशिष खरात आणि अनिस शेख यांनी सीसीटीव्ही फुटेजचे बारकाईने विश्लेषण केले असता संशयित आरोपी पुण्यातील विविध भागांत घरफोड्या करत असल्याचे समोर आले. आरोपी पुणे रेल्वे स्टेशन परिसरात येऊन एका लॉजमध्ये थांबले होते आणि त्यानंतर परराज्यात निघून गेल्याचेही तपासात उघड झाले. दरम्यान, पोलिसांनी या आरोपींच्या हालचालींवर गुप्तपणे लक्ष ठेवले होते. जवळपास महिनाभराच्या तपासानंतर माहिती मिळाली की, सीसीटीव्हीत दिसलेले आरोपी पुन्हा घरफोडीच्या उद्देशाने विश्रामबाग परिसरात आले असून ते ओंकारेश्वर मंदिराजवळ थांबले आहेत. तपास पथकाने सापळा रचून दोन्ही आरोपींना चारही बाजूंनी घेरून ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान आरोपींनी घरफोडी केल्याची कबुली दिली. त्यांनी चोरी केलेले दागिने पुणे रेल्वे स्टेशन परिसरातील एका लॉजमध्ये लपवून ठेवल्याचे सांगितले. पोलिसांनी लॉजवर छापा टाकून ३२ तोळे सोने आणि १२५ ग्रॅम चांदी हस्तगत केली.तपासात आणखी धक्कादायक माहिती समोर आली. आरोपी आकाश सुभाष हा उत्तर प्रदेशातील 'सनी गँग'शी संबंधित असून त्याच्यावर खून, खुनाचा प्रयत्न आणि गँगस्टर ॲक्ट अंतर्गत गंभीर गुन्हे दाखल आहेत. आरोपींना न्यायालयात हजर केले असता ६ मार्च २०२६ पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. तपासात आरोपींनी पुणे शहरात विश्रामबाग, समर्थ, खडक आणि भोसरी पोलीस ठाणे हद्दीत एकूण पाच घरफोड्या केल्याची कबुली दिली आहे. या प्रकरणात सुमारे ६२ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अप्पर पोलीस आयुक्त राजेश बनसोडे, उपायुक्त ऋषिकेश रावले, सहाय्यक पोलीस आयुक्त चंद्रकांत भोसले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रदीप कसबे आणि पोलीस निरीक्षक (गुन्हे) अरुण घोडके यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. तपास पथकाचे सहायक पोलीस निरीक्षक राजेश उसगावकर तसेच पोलीस अंमलदार सचिन कदम, गणेश काठे, अमोल भोसले, शैलेश सुर्वे, सचिन अहिवळे, कैलास डुकरे, जाकीर मणियार, आशिष खरात, राहुल मोरे, अनिस शेख, शिवदत्त गायकवाड, सागर मोरे, अर्जन थोरात, नितीन बाबर आणि अर्जुन कुडाळकर यांनी ही कारवाई केली.

# महिला दिनानिमित्त पुण्यात दुय्यम निबंधक कार्यालयांचा कारभार महिलांकडे

पुणे । प्रतिनिधी

आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून शहरातील मुद्रांक शुल्क विभागाच्या दुय्यम निबंधक कार्यालयाचे सारथ्य महिला कर्मचारीच सांभाळणार आहेत. विशेष म्हणजे सर्व कारभार महिलांच्याच हाती असणार आहेत. त्यातही शहरातील दुय्यम निबंधक कार्यालये केवळ महिला पक्षकार व महिला वकिलांसाठी सुरू ठेवण्यात येणार आहेत, अशी माहिती मुद्रांक जिल्हाधिकारी संतोष हिंगाणे यांनी दिली.



जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून महिलांनी महिलांसाठी या विशेष उपक्रमांतर्गत सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर कार्यालयाच्या अंतर्गत असलेल्या ११ सह दुय्यम निबंधक कार्यालये केवळ महिला पक्षकार व महिला वकिलांसाठी सुरू ठेवण्यात येणार आहेत. सह दुय्यम निबंधक हवेली क. १, २, ५, ७, १०, ११, १४, १५, १९, २६ व २७ ही कार्यालये सुरू ठेवण्यात येणार आहेत. या दिवशी सदर सर्व कार्यालयामध्ये दुय्यम निबंधक म्हणून महिला कर्मचारी काम पाहणार आहेत.

दरम्यान वरील कार्यालयांशिवाय सह दुय्यम निबंधक हवेली क्र. १७, २१, २२, २३ व २५ ही कार्यालये या दिवशी नियमित दस्तांच्या नोंदणीसाठी नेहमीप्रमाणे सुरू राहतील. या कार्यालयातही दुय्यम निबंधक म्हणून महिला कर्मचारी म्हणून काम करतील. महिला पक्षकारांच्या लाभातील कुलमुखत्यारपत्रांचे दस्त ज्या दस्तांमध्ये पक्षकार महिला नसतील, परंतु ओळख देणारी महिला वकील असेल, असे सर्वसाधारण दस्तऐवज महिलांना मालमत्ता हक्क व कायदेशीर सक्षमीकरणाच्या दृष्टीने प्रोत्साहन देणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. सर्व महिला पक्षकार व महिला वकिलांनी या विशेष उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुद्रांक जिल्हाधिकारी हिंगाणे यांनी केले आहे.

# भटक्या कुत्र्याला अमानुष मारहाण; पिंपरी-चिंचवडमध्ये क्रूरतेचा कळस

**पिंपरी । प्रतिनिधी**

**शहरातील तुकारामनगर पोलिश स्टेशन हद्दीत टोळक्याकडून एका भटक्या कुत्र्याला अतिशय निर्दयीपणे मारहाण करण्यात आली आहे. २८ फेब्रुवारीला रात्री एक वाजता दरम्यान स्वप्निल सखाराम सावंत या माथेफिरू व्यक्तीने रस्त्यावर उभ्या असलेल्या एका भटक्या कुत्र्याला पाठीमागून हातात पकडून त्यानंतर त्याला हवेमध्ये गोल गोल फिरवून जमिनीत जोरदार आपटून जखमी केला आहे. त्यानंतर आरोपी व तिथे असलेल्या सहा ते सात जणांनी भर रस्त्यात नाचून व आराडाओरडा करून त्यांचे जवळ असलेल्या चार चाकी वाहनाने भरधाव वेगाने जाऊन रस्त्याच्या कडेला उभे असलेल्य कुत्र्याला उडवण्याचा प्रयत्न केला आहे. ही सर्व घटना सीसीटीव्ही कॅमेरामध्ये कैद झाली आहे. या प्रकरणात एका तरुणाने दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी स्वप्निल सखाराम सावंत या आरोपी विरोधात संत तुकाराम नगर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, पिंपरी-चिंचवड शहरातील संत तुकाराम नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत भटक्या कुत्र्यावर निर्घृण अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. २८ फेब्रुवारी रोजी मध्यरात्री एक वाजण्याच्या सुमारास तुकाराम नगर परिसरात ही घटना घडली. या प्रकारामुळे प्राणीप्रेमींमध्ये संतापाची लाट उसळली आहे. स्वप्निल सखाराम सावंत या तरूणाने रस्त्यावर उभ्या असलेल्या एका भटक्या कुत्र्याला मागून पायाला पकडले. त्यानंतर त्याला हवेत गोल गोल फिरवत जोरात जमिनीवर आपटले. या अमानुष मारहाणीमुळे कुत्रा गंभीर जखमी झाला. एवढ्यावरच न थांबता आरोपीसह सहा ते सात जणांनी भर रस्त्यात आरडाओरडा करत गोंधळ केला. त्यानंतर त्यांच्या ताब्यातील चारचाकी वाहन भरधाव वेगाने चालवत रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या त्याच कुत्र्याला उडवण्याचाही प्रयत्न करण्यात आल्याचे समोर आले आहे. ही संपूर्ण घटना परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून, त्याच्या आधारे पोलिसांनी तपासाला गती दिली आहे. संबंधित व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर नागरिकांनी संताप व्यक्त करत कठोर कारवाईची मागणी केली आहे. या प्रकरणी एका तरुणाने दिलेल्या तक्रारीवरून संत तुकाराम नगर पोलीस ठाण्यात स्वप्निल सखाराम सावंत याच्याविरुद्ध प्राणी क्रूरता प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून इतर सहभागींची ओळख पटविण्याचे काम सुरू असून पुढील तपास सुरू आहे.

# महापालिकेचा 'बुलडोझर' सुसाट! लोहगाव-वाघोलीत बड्या हॉटेल्सवर कारवाई

**पुणे । प्रतिनिधी**

महापालिका आयुक्तांच्या आदेशानुसार लोहगाव ते वाघोली तसेच विमान नगर, निको गार्डन परिसरातील एका हॉटेलवर बुधवारी सकाळी बेकायदा बांधकामांविरोधात कारवाई केल्याची माहिती पालिकेच्या अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभागाचे उपायुक्त सोमनाथ बनकर यांनी दिली. मात्र, या कारवाईवरून स्थानिक नागरिकांनी नाराजी व्यक्त केली असून काही ठराविक बांधकामांवरच कारवाई केल्याचा आरोप केला आहे.

या कारवाईत मुख्य सुरक्षा अधिकारी डॉ. रमेश शेलार यांच्यासह महापालिकेचे २० पोलीस, एमएसएफ जवान ७०, जेसीबी १५, गॅसकटर १५, ब्रेकर १५ यांचा वापर केला. या कारवाईसाठी ३० सहाय्यक अतिक्रमण निरीक्षक, १५ अतिक्रमण निरीक्षकआणि २०० बिगारी सेवकांची मदत घेतली.

कारवाईदरम्यान सौरभ खरात, कोकाटे, संग्राम पवार (कनिष्ठ अभियंता), अभिषेक कुसाळकर (कनिष्ठ अभियंता, बांधकाम



विकास विभाग), इरफान शेख (उपअभियंता, बांधकाम विभाग) उपस्थित होते. कारवाई केलेला भाग आता महापालिकेच्या हद्दीत आलेला असला तरी मागील दोन आठवड्यांपूर्वी या भागातील बांधकाम परवानगी तसेच नियोजनाचे अधिकार पीएमआरडीएकडे होते. हे अधिकार आता महापालिकेकडे आले असले तरी अद्याप पालिकेने त्यांच्याकडून कागदपत्रे घेतलेली नाही. तसेच अनेकांनी त्यांच्याकडे परवानगीसाठी अर्ज केलेला आहे. असे असतानाही महापालिकेने चुकीच्या पध्दतीने कारवाई केल्याचा दावा काही नागरिकांनी केला आहे. या कारवाईवेळी अनेक नागरिकांनी स्थानिक नगरसेवकांशी संपर्क साधत कारवाई थांबविण्याची मागणी केली. मात्र, नगरसेवकांनाही याची काहीच माहिती नसल्याने त्यांनाही यावर काही बोलता आले नाही. या कारवाईपूर्वी महापालिकेने १८ बांधकामांना नोटीस दिली होती. त्यात व्हीआयपी या हॉटेलचाही समावेश होता. पालिकेचे पथक कारवाईसाठी गेल्यावर या हॉटेलमध्ये ग्राहक बसलेले होते. या ग्राहकांना बाहेर काढत महापालिकेने हॉटेलचे अनधिकृत बांधकाम काढून टाकले.

# डिजिटल अटकेची भीती दाखवत बारामतीतील ज्येष्ठ महिलेला ४६ लाखांचा गंडा

बारामती: बारामती तालुक्यातील डोर्लेवाडी येथील एका ज्येष्ठ महिलेला अनोळखी व्यक्तिने व्हाटसअपद्वारे व्हीडीओ कॉल करत वरिष्ठ पोलिस अधिकारी असल्याची बतावणी करत डीजिटल अटकेची भिती दाखवत सुमारे ४५ लाख ६० हजार रुपयांना गंडा घातल्याचा धक्कादायक प्रकार घडला.



या प्रकरणी बारामती शहर पोलिस ठाण्यात शकुंतला उद्धव खर्डे (वय ७४, रा. डोर्लेवाडी, ता. बारामती) यांनी फिर्याद दिली. पोलिसांनी अज्ञाताविरोधात भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांन्वये माहिती तंत्रज्ञान अधिनियमानुसार गुन्हा दाखल केला. दि. १४ ते २७ फेब्रुवारी या कालावधीत ही घटना घडली.एका मोबाईल क्रमांकाद्वारे अनोळखी व्यक्तिने खर्डे यांना व्हाटसअप कॉल केला. त्याने मी संदीप पाटील नावाचा पोलीस अधिकारी बोलत असल्याचे खोटे सांगून पोलिस गणवेशात व्हिडिओ कॉल करून विश्वास संपादन केला. त्यानंतर फिर्यादी यांच्याविरुद्ध अटक वॉरंट असल्याचे सांगून त्यांना डिजिटल अरेस्ट होईल अशी भीती दाखवण्यात आली.त्या अज्ञात व्यक्तिने भिती व मानसिक दबाव निर्माण करून फिर्यादी यांच्या आर्थिक बाबींची माहिती घेतली. त्यानंतर त्यांच्या बँकेतील एफडी काढून घेत ते पैसे वेगवेगळ्या बँक खात्यावर वर्ग करण्यास सांगितले. त्याच्या सांगण्यावरून फिर्यादीने पहिल्या वेळी ३४ लाख ६० हजार व दुसऱ्या वेळी ११ लाख रुपये असे एकूण ४५ लाख ६० हजार रुपये इतकी रक्कम वेगवेगळ्या बँक खात्यावर वर्ग करून घेतली. त्यानंतर त्याने संपर्क बंद केला. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे फिर्यादीच्या लक्षात आले. त्यानंतर त्यांनी पोलिसांत धाव घेत तक्रार दाखल केली.

# अजित पवारांच्या विमान अपघाताची चौकशी होणार

पुणे । प्रतिनिधी

माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या बारामतीजवळ झालेल्या विमान अपघाताला एक महिना उलटला असून चौकशी अद्यापही पूर्ण झालेली नाही. या पार्श्वभूमीवर आज व्हीएसआर विमान कंपनीचे वरिष्ठ ऑफिसर पुण्यातील सीआयडी कार्यालयात चौकशीसाठी हजर झाले.

या प्रकरणी आमदार रोहित पवार यांनी कंपनीच्या मालकाची चौकशी करण्याची मागणी केली होती. सीआयडी अधिकाऱ्यांकडून रोहित पवार यांनी केलेल्या आरोपांच्या अनुषंगाने विविध प्रश्न विचारले जाण्याची शक्यता आहे.

अजित पवार यांच्या विमान अपघातात त्यांच्यासह सहा जणांचा मृत्यू झाला होता. या घटनेनंतर आर.के. सिंह यांनी त्यांच्या कंपनीच्या विमानात कोणताही तांत्रिक बिघाड नसल्याचा दावा केला होता. मात्र, त्यानंतर ते माध्यमांसमोर आले नव्हते. दरम्यान, या प्रकरणात आमदार रोहित पवार यांनी व्हीएसआर कंपनी तसेच केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री यांच्यावरही गंभीर आरोप केले आहेत. अपघातापूर्वी विमानाचा वैमानिक ऐनवेळी बदलण्यात आल्याचा तसेच विमानात गरजेपेक्षा जास्त इंधन साठवण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

# नवीन कात्रज बोगद्याजवळ अपघात; सिमेंट वाहतूक करणाऱ्या बल्करने वाहनांना उडविले, दोघे जखमी

पुणे । प्रतिनिधी

मुबंई-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावर सिमेंटची वाहतूक करणाऱ्या बल्करने दिलेल्या धडकेत दोघेजण जखमी झाले असून, तीन वाहनांचे नुकसान झाले आहे. हा अपघात गुरूवारी (दि.०५) दुपारी साडे बारा वाजताच्या सुमारास नवीन कात्रज बोगद्याच्या पुढे असलेल्या पेट्रोलपंपानजीक घडला आहे.

अपघातात कारमधील चालक चरणदास लक्ष्मण आकटे ( ६४,रा. हरपुडे देवरुख, रत्नागिरी), सिमेंट बल्कर चालक आदृश्यप्पा गुरू सिद्दप्पा मस्तीहोली (३५,रा.बेलगम कर्नाटक) हे जखमी झाले असून त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी, आंबेगाव पोलिस ठाण्यात सिमेंट बल्कर चालकावर गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते.




याबाबत बोलताना आंबेगाव पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक शरद झिने यांनी सांगितले, सिमेंट वाहतूक करणाऱ्या बल्कर ट्रकने दुपारी साडे बारा वाजताच्या सुमारास पुणे बंगळरू राष्ट्रीय महामार्गावर दोन वाहनांना पाठीमागून धडक दिली. सिमेंट वाहतूक करणारा हा बल्कर साताऱ्याकडून मुंबईकडे जाणाऱ्या महामार्गावर निघाला होता. कात्रज बोगद्याच्यापुढे उतारावर येथील एका पेट्रोलपंपासमोर त्याने वाहनांना पाठीमागून धडक दिली. त्यानंतर तो दुरीपुरावर थांबला. अपघातात कारमधील चालक अडकून पडला होता. घटनेची माहिती मिळताच आंबेगाव पोलिस आणि अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेत कारचालकाला बाहेर काढून नजीकच्या खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. यावेळी सिमेंट वाहतूक करणाऱ्या बल्करमधील चालक सुद्धा जखमी झाला असून, त्याला देखील उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघातामुळे काही वेळ महामार्गावर वाहतूक कोंडी झाली होती. पोलिसांनी अपघातग्रस्त वाहने बाजूला करून वाहतूक सुरळीत केली.

# माऊलींच्या पादुकांऐवजी विश्वस्तांच्या पाद्य पूजेवरून वाद, व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल

पुणे । प्रतिनिधी

संत परंपरेत चंद्र-सूर्य अस्तित्वात असेपर्यंत पूजन हे केवळ माऊलींच्या पादुकांचेच व्हावे, असा भाव वारकरी संप्रदायात मानला जातो. मात्र, श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी, आळंदीचे विश्वस्त योगी निरंजननाथ गुरु शांतिनाथ यांनी काही साधकांकडून पाद्यपूजा करून घेतल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, त्यावरून तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. दरम्यान, या प्रकरणावर संबंधित विश्वस्त किंवा संस्थान कमिटीची अधिकृत भूमिका अद्याप स्पष्ट झालेली नाही. मात्र, व्हायरल झालेल्या व्हिडिओमुळे आळंदीतील धार्मिक वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.



व्हायरल झालेल्या या व्हिडिओत काही साधक योगी निरंजननाथ यांच्या पायांना पाणी अर्पण करून पाद्यपूजा करताना दिसत असल्याचा दावा करण्यात येत आहे. या प्रकारावरून वारकरी भाविक व सामाजिक माध्यमांवर मोठ्या प्रमाणावर टीका व्यक्त होत आहे. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पादुकांचे पूजन ही वारकरी परंपरेची मुख्य ओळख असताना एखाद्या व्यक्तीची अशा प्रकारे पूजा होणे योग्य नसल्याचे अनेकांनी म्हटले आहे. यासंदर्भात संत साहित्याचा दाखला देत वारकरी संप्रदायातील काही अभ्यासकांनीही नाराजी व्यक्त केली आहे. सोशल मीडियावर या घटनेवरून तीव्र शब्दांत टीका होत असून, माऊलींच्या पादुकांचे पूजन ही वारकरी परंपरेची शाश्वत परंपरा आहे. व्यक्तिपूजेमुळे संत विचारांचे विकृतीकरण होऊ नये, अशी प्रतिक्रिया अनेकांनी व्यक्त केली आहे. एकमेका लागतील पायी रे ही समतेची शिकवण असलेल्या वारकरी परंपरेत अशा प्रकारच्या घटनांमुळे संभ्रम निर्माण होत असल्याचेही काही भाविकांचे मत आहे. या प्रकरणावर संबंधित विश्वस्त किंवा संस्थान कमिटीची अधिकृत भूमिका अद्याप स्पष्ट झालेली नाही. मात्र, व्हायरल झालेल्या व्हिडिओमुळे आळंदीतील धार्मिक वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.

# तोंडाला मास्क बांधून तिघे आले, प्रेमी युगलाला मारहाण करत सोन्या-चांदीचे दागिने पळवले

बारामती । प्रतिनिधी

बारामतीतील तांदुळवाडी येथे तरुणावर कोयत्याने वार करून सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम लुटल्याप्रकरणी तिघांना अटक करण्यात आली आहे. २६ फेब्रुवारीला रात्री तांदुळवाडी विमानतळ रोडलगत असलेल्या एलसी कंपनी लेक येथील मोकळ्या जागेत फिर्यादी हे त्यांच्या मैत्रिणीसोबत बसले होते. त्यावेळी तोंडाला मास्क व रुमाल बांधलेल्या तिघा इसमांनी त्यांच्या जवळ येत लोखंडी सत्तूर, कोयत्याचा धाक दाखवून पैशांची मागणी केली. विरोध केल्यावर एका आरोपीने फिर्यादीच्या डाव्या पायावर वार करून जखमी केले.




त्यानंतर आरोपींनी सोन्याची सुमारे २१ ग्रॅम वजनाची चैन, चांदीची अंगठी, चांदीची चैन, आणखी एक चांदीची अंगठी व २ हजार रुपये रोख असा एकूण ३ लाख २४ हजार रुपयांचा मुद्देमाल जबरदस्तीने काढून घेतला व 'परत इकडे यायचं नाही' अशी धमकी देत तेथून पसार झाले. याप्रकरणी बारामती तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रसाद गणपत भोसले, धैर्यशील प्रशांत आगवणे व कृष्णा नाना गाडेकर यांना २८ फेब्रुवारी रोजी अटक करण्यात आली. न्यायालयाने त्यांना चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. पोलीस कोठडीत चौकशीदरम्यान आरोपींकडून सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा एकूण ३ लाख २४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

घटनेनंतर जखमी तरुणाला तात्काळ बारामती येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. दरम्यान, या घटनेमुळे तांदुळवाडी व विमानतळ रोड परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. बारामती तालुका पोलिसांनी गुन्ह्याच्या तपासासाठी सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण व स्थानिकांच्या मदतीने आरोपींचा माग काढला. पुढील तपासात या आरोपींनी यापूर्वी अशाच प्रकारचे गुन्हे केले आहेत का, याचाही तपास सुरू असून पोलिसांकडून अधिक माहिती गोळा केली जात आहे.